| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक १०३ वा | शनिवार दिनांक २७ जून, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## नशामुक्त भारत अभियानांतर्गत धाराशिव जिल्ह्यात जनजागृतीची व्यापक चळवळ; हजारो विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

धाराशिव,दि.२५ जून (जिमाका) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,महाराष्ट्र शासन यांच्या नशामुक्त भारत अभियानांतर्गत सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालय,धाराशिव,जिल्हा परिषद समाजकल्याण विभाग तसेच यश मेडिकल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाभर विविध जनजागृतीपर उपक्रम उत्साहात राबविण्यात आले. व्यसनमुक्त समाज निर्मितीचा संदेश देणाऱ्या या अभियानात विद्यार्थी,युवक,शिक्षक, अधिकारी आणि सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.प्रारंभी राजर्षी छत्रपती शाहू महाराज, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करून अभियानाला सुरुवात करण्यात आली.

अभियानाचा प्रारंभ जिल्हा परिषद कन्या प्रशाला,धाराशिव येथे आयोजित व्यसनमुक्ती शपथविधी कार्यक्रमाने झाला.या कार्यक्रमात हजारो विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त राहण्याची शपथ घेतली.यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियांवदा म्हाडदाळकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे,जिल्हा समाजकल्याण अधिकारी सचिन कवले,यश मेडिकल फाउंडेशनचे डॉ. संदीप तांबारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी डॉ.संदीप तांबारे यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांचे दुष्परिणाम, त्यावरील उपाययोजना आणि व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी आयुष्यभर व्यसनमुक्त राहण्याची शपथ घेतली.

यानंतर समाजात व्यसनमुक्तीबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी कन्या प्रशाला ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जिल्हा परिषद कार्यालयापर्यंत भव्य जनजागृती दिंडी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी हातात पोस्टर्स,बॅनर्स आणि जनजागृतीपर फलक घेऊन सहभाग नोंदविला.

नशामुक्त भारत – सशक्त भारत, नशामुक्त भारत – विकसित भारत आणि नशामुक्त धाराशिव – सशक्त धाराशिव अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे युवकांसाठी व्यसनमुक्ती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण सचिन कवले होते.प्रमुख उपस्थितीमध्ये दिव्यांग कल्याण विभागाचे सचिदानंद बागर, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त परमेश्वर




खुने,समाजकल्याण निरीक्षक अमोल कातगळे तसेच डॉ.संदीप तांबारे यांचा समावेश होता.

यावेळी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण सचिन कवले यांनी उपस्थित युवकांना मार्गदर्शन करताना प्रत्येकाने व्यसनमुक्त समाज निर्मितीचा संकल्प करून धाराशिव जिल्हा नशामुक्त करण्यासाठी सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन केले.

कार्यशाळेत डॉ.संदीप तांबारे यांनी व्यसनांचे दुष्परिणाम, व्यसनमुक्तीसाठी उपलब्ध उपचारपद्धती,पुनर्वसन प्रक्रिया तसेच युवकांची सामाजिक जबाबदारी या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. प्रत्येक युवकाने आपल्या कुटुंबासह संपूर्ण जिल्हा व्यसनमुक्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा,असे आवाहनही त्यांनी केले.

या सर्व उपक्रमांमध्ये जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक,शिक्षक,विद्यार्थी, समाजकल्याण विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

समारोप प्रसंगी सर्व उपस्थितांनी पुन्हा एकदा नशामुक्त भारताची शपथ घेत व्यसनमुक्त समाज निर्मितीचा दृढ संकल्प व्यक्त केला.व्यसनमुक्त समाजाच्या दिशेने जनजागृतीची व्यापक चळवळ उभी करणारे हे अभियान धाराशिव जिल्ह्यात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

## क्राईम न्युज

### अवैध तंबाखु पानमसाला व सिगारेट विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, राम हिरा राठोड, वय ६० वर्षे, रा.केशेगाव तांडा ता. तुळजापूर जि. धाराशिव, संभाजी अभिमन्यु जाधव, वय ३७ वर्षे, रा. शहापुर ता. तुळजापूर जि. धाराशिव, तुळशीराम बुताळी घोडके, वय ४२ वर्षे, रा. देवसिंगा नळ ता. तुळजापूर, महादेव उर्फ प्रकाश सावंत, वय ५८ वर्षे, रा. जळकोट ता. तुळजापुर जि. धाराशिव, ज्ञानेश्वर शिवाजी बिराजदार, वय २३ वर्षे, रा. सिंदगाव ता. तुळजापुर जि. धाराशिव यांनी दि.२५.०६.२०२६ रोजी १४.३० ते १७.३० वा. सु. केशेगाव येथे किराणा दुकानात, अंबिका नावाच्या किराणा दुकानात शहापुर येथे, आदित्य एन्टरप्रायझेस नावाच्या किरणा दुकानात देवसिंगा येथे, जिल्हा परिषद शाळा जळकोट येथे सिंदगाव येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सव पदार्थ विमल पान मसाला एकुण १,२४० किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना नळदुर्ग पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम- कलम ६ (अ),२४ सिगारेट व इतर तंबाखु उत्पादन जाहितरातीस प्रति व वाणिज्य पुरवठा विनीमय अधिनियम २००३ अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे स्वतंत्र ५ गुन्हे नोंदवले आहेत.

### प्राण्यांची निर्दयपणे कत्तल करुन विक्री करणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- परंडा पोलीस ठाणेअंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, बब्बु उर्फ सर्फराज महंम्मद कुरेशी, अमजद गणी कुरेशी, इमाम गणी अमजद गणी कुरेशी सर्व रा. कुरेशी गल्ली परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.२५.०६.२०२६ रोजी आपल्या राहते घराचे पाठीमागे कुरेशी गल्ली परंडा येथे गोवंशीय जनावरांचे ४०० किलो मांस, तीन कातडी व दोन सुरे असा एकुण ८१,१०० किंमतीचे मांस विक्री करीत जवळ बाळगलेले परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१), ११(१)(च), ११(१)(ज), ११(१)(झ) सह कलम ५ (क),९, ९(अ) महा प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ३५६ कारवाया करुन ३,४७,०००'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि. २५जुन रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ३५६ कारवाया करुन ३,४७,०००'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## शेतकऱ्यांच्या खिशाला कात्री; मकोकाची घोषणा झाली... पण कारवाई कधी? बोगस बियाणे-खत माफियांना अभय कोणाचे?

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- मराठवाड्यासह राज्यभरातील शेतकरी आजही बोगस बियाणे आणि बनावट खतांच्या विळख्यात अडकलेला आहे. दरवर्षी लाखो रुपये खर्च करून शेतकरी पेरणी करतो; मात्र उगवण होत नाही, पीक हातचे जाते आणि कर्जाचा डोंगर वाढत जातो.

आता आमदार प्रविण स्वामी यांनी बोगस बियाणे व खत विक्रेत्यांवर मकोका लावण्याची मागणी करत आंदोलनाची सुरुवात केली आहे. हा आवाज स्वागतार्ह आहे; पण शेतकऱ्यांचा प्रश्न असा आहे – घोषणा झाली, आता प्रत्यक्ष कारवाई कधी?

फक्त पत्रकार परिषद, आंदोलन किंवा निवेदने देऊन हा प्रश्न सुटणार नाही. बनावट बियाणे तयार करणारे, पुरवठा करणारे, विक्री करणारे आणि त्यांना संरक्षण देणारे संपूर्ण रॅकेट उद्ध्वस्त झाले तरच शेतकऱ्याला न्याय मिळेल.


आजही अनेक ठिकाणी डुप्लिकेट बियाणे आणि निकृष्ट खतांचा पुरवठा सुरू असल्याच्या तक्रारी येतात. मग प्रश्न उभा राहतो – नियंत्रण यंत्रणा नेमकी कुठे आहे? तपासण्या वेळेवर का होत नाहीत? दोषींवर कठोर गुन्हे दाखल का होत नाहीत? शेतकरी हा प्रयोगशाळेतील नमुना नाही. त्याच्या एका चुकीच्या हंगामामागे संपूर्ण कुटुंबाचे भविष्य उद्ध्वस्त होते. त्यामुळे आता केवळ आश्वासनांची नव्हे, तर निर्णायक कृतीची गरज आहे.

बोगस बियाणे व खत प्रकरणातील दोषींवर तातडीने कठोर गुन्हे दाखल करावेत. संपूर्ण पुरवठा साखळीची चौकशी करून सूत्रधारांपर्यंत कारवाई पोहोचवावी. प्रत्येक जिल्ह्यात विशेष तपास पथक स्थापन करावे. फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी. तपासात दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी.

शेतकऱ्यांच्या खिशाला कात्री लावणाऱ्यांना अभय नको, कायद्याचा धाक हवा!

घोषणांपेक्षा आता कृतीची वेळ आली आहे. राज्यातील प्रत्येक शेतकरी आज हाच सवाल विचारत आहे – मकोका कधी? असा सवाल उभा राहात आहे.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मारक समिती धाराशिवच्यावतीने शाहू महाराज जयंती साजरी



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मारक समिती धाराशिव च्या वतीने दिनांक २६ जून २०२६ रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १५२ वी जयंती राजर्षी छत्रपती शाहू चौक धाराशिव येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

नगर परिषद धाराशिव च्या नगराध्यक्ष नेहा राहुल काकडे यांच्या हस्ते शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्प अर्पण करण्यात आले . राजर्षी छत्रपती शाहू महाराज चौकाचे लवकरच सुशोभीकरण करण्यात येईल असे आश्वासन नगर परिषद धाराशिव च्या नगराध्यक्षा नेहा राहुल काकडे यांनी दिले.

यावेळी प्रा.रवी सुरवसे यांनी लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याबद्दल विचार व्यक्त केले तसेच त्यांनी पी.एच.डी. प्राप्त केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला व राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे च्या धाराशिव जिल्हा अध्यक्ष पदी निवड झाल्या बदल उमेश राजेनिंबाळकर यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मारक समिती धाराशिव चे अध्यक्ष बलराज रणदिवे यांनी प्रास्ताविक तर सचिव बालाजी तांबे यांनी सूत्रसंचालन केले. या जयंती सोहळ्यास ज्येष्ठ शिक्षणतज्ञ एम.डी. देशमुख,प्रा. कॅप्टन बी. बी. बागल,नगरपरिषद धाराशिव चे नगरसेवक अभिजीत काकडे, सुशांत सोनवणे, दिपाली पाटील, अलका पारवे, विलास लोंढे, आकाश तावडे,प्रवीण माळी, बापू पवार,सिद्धार्थ बनसोडे, अक्षय जोगदंड, राहुल काकडे,अमोल राजेनिंबाळकर, दाजीआप्पा पवार, धनंजय पाटील, माजी नगरसेवक पृथ्वीराज चिलवंत,शिवसेनेचे माजी शहरप्रमुख सोमनाथ गुरव, भा.न. शेळके, शीला उंबरे, रोहित पडवळ,महादेव माळी, यु.व्ही.माने, राम चंदनशिवे,विजय गायकवाड,कुणाल निंबाळकर,मुकुंद घाटगे, विजय पवार, ॲड. तसलीम काझी, प्रा. अभिमान हंगरगेकर, सुरेश शेळके, उमाकांत कुलकर्णी, अमोल पडवळ, आकाश मुंडे,प्रशांत सावंत,रणजीत बनसोडे, दिलीप वाघमारे, यशवंत समुद्रे, लहू शिंदे, प्रा.आबा गाठे, शंकर खुणे, ड. जयप्रकाश साळुंके,लक्ष्मण भालेराव, अनंत वाघमारे,बाळासाहेब माने,प्रदीप शिंदे, प्रभाकर बनसोडे, यु.व्ही. माने, अमोल घोगरे,पांडुरंग मते, समता सैनिक दलाचे नामदेव वाघमारे, सचिन दिलपाक आदी उपस्थित होते.शेवटी उपस्थितांचे आभार उमाकांत कुलकर्णी यांनी मानले.

## धाराशिवच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांवर मुख्यमंत्र्यांशी चर्चा

### विमानतळावर UAV हब, मराठवाड्यासाठी पूरपाणी वळविणे, नविकरणीय डिझेल निर्मिती व सिंचन प्रकल्पाला गती देण्याबाबत सकारात्मकता राणाजगजितसिंह पाटील यांच्याशी चर्चा

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या दीर्घकालीन विकासाला चालना देणाऱ्या विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यासोबत मुंबई येथील 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी सविस्तर चर्चा झाली. रोजगार, उद्योग, जलव्यवस्थापन, ऊर्जा आणि शेती क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणाऱ्या या प्रस्तावांबाबत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी सकारात्मक भूमिका दर्शविल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. धाराशिव विमानतळ परिसरात देशातील पहिले मानवरहित हवाई वाहन ण-त (ड्रोन) संशोधन, उत्पादन आणि प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. विमानतळाची उपलब्ध जागा, भौगोलिक स्थिती आणि भविष्यातील क्षमता लक्षात घेता येथे ड्रोन तंत्रज्ञानाशी संबंधित संशोधन व विकास केंद्र उभारल्यास धाराशिव राष्ट्रीय स्तरावरील तंत्रज्ञान केंद्र म्हणून विकसित होऊ शकते. कृषी, संरक्षण, आपत्ती व्यवस्थापन, सर्वेक्षण, वैद्यकीय सेवा आणि औद्योगिक क्षेत्रात ड्रोनच्या वाढत्या वापरामुळे या प्रकल्पातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती, स्टार्टअप्सना संधी आणि औद्योगिक गुंतवणूक आकर्षित होण्याची अपेक्षा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त करण्यात केली. याशिवाय दरवर्षी कोल्हापूर व सांगली परिसरातील अतिरिक्त पूरपाणी समुद्रात वाहून जाण्याऐवजी ते मराठवाड्याकडे वळविण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालाबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. हा प्रकल्प मार्गी लागल्यास धाराशिवसह मराठवाड्यातील दुष्काळी भागांना मोठा दिलासा मिळणारआहे. शेती, उद्योग, पिण्याचे पाणी आणि भूजल पुनर्भरणासाठी हा प्रकल्प 'गेमचेंजर' ठरणार असल्याचा विश्वासही आमदार पाटील यांनी व्यक्त केला.आहे.

शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी कृषी अवशेषांपासून नविकरणीय डिझेल निर्मितीचे राज्यस्तरीय धोरण तयार करण्याची मागणीही आमदार पाटील यांनी यावेळी केली आहे. ऊस, सोयाबीन, कापूस, तूर व मका यांसारख्या पिकांच्या अवशेषांचा उपयोग इंधन निर्मितीसाठी केल्यास शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध होईल. तसेच या इंधनाचा वापर टप्प्याटप्प्याने राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये सुरू केल्यास इंधन खर्चात मोठी बचत होऊ शकते. पर्यावरण संरक्षणासोबतच राज्याच्या अर्थव्यवस्थेलाही याचा लाभ होणार असल्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली आहे. बैठकीत कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या तुळजापूर ते उमरगा-लोहारा या पुढील टप्प्याला गती देण्याची मागणीही करण्यात आली. विशेषतः तुळजापूर, लोहारा आणि उमरगा तालुक्यातील सिंचनापासून वंचित असलेल्या गावांना या योजनेचा लाभ मिळावा, यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत चर्चा झाली. या भागात पाणी पोहोचल्यास लाखो एकर क्षेत्र सिंचनाखाली येऊन शेती उत्पादनात वाढ होईल, तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

**मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस सकारात्मक : आमदार पाटील**

मराठवाड्याला दुष्काळाच्या चक्रातून बाहेर काढून आधुनिक, आत्मनिर्भर आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम प्रदेश बनविण्याच्या दृष्टीने हे सर्व प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगत, मुख्यमंत्री फडणवीस यांनी या विषयांबाबत सकारात्मकता दर्शविल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी स्पष्ट केले. या चर्चेमुळे धाराशिव आणि मराठवाड्याच्या विकासाच्या नव्या शक्यता निर्माण झाल्याचे मानले जात आहे.

## कारखान्याचे मशीनरी पार्ट अंदाजे २,७७,१०० किंमतीचे अज्ञाताने चोरले

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि. १८.०६.२०२६ रोजी मनोरमा रुपामा नॅचरल शुगर प्रायव्हेट लि. देवसिंगा ता. तुळजापूर येथील स्टोअर रुम मधील ठेवलेले कारखान्याचे मशीनरी पार्ट अंदाजे २,७७,१०० किंमतीचे अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- ज्ञानदेव दगडु गुंड, वय ६५ वर्षे, रा. हरीशचंद्र नगर जिल्हा कारागृहाचे पाठीमागे धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.२५.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## शेतकऱ्याचे आर्थिक जीवनमान सुधारलेच पाहिजे

सरकार बऱ्याच जणास मदत करते. संकट काळात भरघोस मदत जाहीर करते. शेतकऱ्यांना वीमा कंपन्यापेक्षा सरकारने मोठी आर्थिक मदत केली आहे. मदतीला धावुन जाणारे सरकार आहे. वास्तविक मदत वारंवार दिली जाते. मदतीचा हेतू चांगला असतो. संकट काळात तर मदत केली पाहिजे. यात दुमत नाही. सरकारला सतत मदत करणे आवघड होते. कर रूपाने जमा झालेला पैसा हा मदतरुपाने संकटकाळात वाटला जातो. काही विकास कामेही होतात. ही वस्तूस्थिती आहे. असे जरी असले तरी प्रत्यक्षात वारंवार मदत करणे परवडते काघ? याचा देखील विचार केला पाहिजे. शेतकरी बांधवांना सरकार वारंवार मदत करते. मात्र कायम स्वरुपी आर्थिक जीवनमान सुधारण्यासाठी योजना तयार करीत नाही किंवा त्याचा अमलही करीत नाही. कर्ज देणे व माफ करणे अशा दुष्ट चक्रात शेतकरी बांधव आडकला जात आहे. शेती व शेतकरी एक असले तरी शेती काहीजन हौस म्हणून कारतात, तर दुसरी बाजू शेती हा व्यवसाय म्हणून पाहिलाही पाहिजे. जो व्यवसाय म्हणून शेती करतो तो शेतकरी सतत शेतात प्रयोग करीत असतो. मेहनत घेत असतो. सर्वात प्रगत शेतकरी पश्चिम महाराष्ट्रातील समजले जातात. या भागत कमी शेतीचा आकार असतो. एकरावर किंवा हेक्टरावर शेती दिसून येत नाही तर गुंट्यावर शेतजमीन दिसून येते. यात अन्नधान्य कमी पिकविले जाते, ज्यांच्याकडे कमी शेती आहे तो एक तर फुल व फळाची शेती करतो. दुसरा व्यवसाय दुधाचा करतो. प्रत्येकाकडे चार चाकी दुध व शेतीमाल वाहुन घेवून जाण्यासाठी गाडी असते. मोटारसायकल असते. त्याच प्रमाणे संरक्षणाचीही जबाबदारी स्वत: घेत असतात. या भागातील नेत्यांनी नद्यांचे पाणी सर्वत्र फिरविले आहे. डोंगरावर शेती केली जाते. आपल्याकडे सुपीक व सपाट जमीन आहे असे असताना शेतीत प. महाराष्ट्रापेक्षा उत्पन्न कमी का? हा विचार करायाला लावणारा प्रश्न आहे. आपल्याकडे काय होते तर कुक्कुटपालनाचा व्यवसाय केले जातो. पालन असे नाव असले तरी पालन नसून तो मारण्यासाठी केला जातो. अनेकजन व्यावसायिक दृष्ट्या विचार न करता स्वत:च खातात हे उघड आहे. आपल्याकडील शेतकरी कोणताही व्यवसाय करण्यात यशस्वी होत नाही कारण व्यावसायिक दृष्टिकोन दिसून येत नाही. शेती हा व्यवसाय म्हणून केला पाहिजे. प्रत्येक शेतीतील वस्तू विकली जाते. मोठ्या शहरात गायीच्या शेंणाच्या गवऱ्या विकल्या जातात. काळी माती विकली जाते ती कुंड्यात टाकण्यासाठी शहरी भागात विकत घेतात. आलिकडे ताक, दही विकले जाते. एकहजार रूपये किलो ग्रामीण भागातील तुप विकले जाते. आंब्याच्या पानाचे तोरण करण्यासाठी शहरी भागत विकत घेतात. फुले विकली जातात. शेततील प्रत्येक उत्पादीत माल विकला जातो. शेतकरी हा व्यावसायिक दृष्ट्याने चालत नाही. कर्ज घेतले तर त्याच कामी वापरले जात नाही. कर्ज तसा विचार केला तर परवडणारे नाही. खाजगीतर अजिबात कर्ज घेवू नये. व्याजाचे दर व मुद्दलीचा विचार केला तर ते परवडते का याचा विचार करावा. मगच कर्जाच्या मागे लागावे. कर्ज घेणे व माफी मागणे हे चक्र कोठेतरी थांबविले पाहिजे. कर्जाच्या बदल्यात त्याची शेती नांगरून दिली पाहिजे. पेरणी करून दिली पाहिजे. आता कृषी विभागाने बदल करावा. त्याच प्रमाणे मार्गदर्शन करावे. आपल्याकडे काय होते. शेजाऱ्याने जे परले तेच आपण करतो. बदल करीत नाही. तसे न होता आपण काही वेगळे करून दाखविले पाहिजे. वेगळे काही पेरले पाहिजे. गावच्या गाव सोयाबिन पेरते. उत्पन्न अधिक होते व भाव कोसळला जातो. ज्यावेळी शेतकऱ्याकडे अधिक पिक येते त्यावेळी भाव कोसळले असतात. मालाचे शॉर्टज होते भाव वाढलेले असतात. ही वस्तूस्थिती सर्वांना माहिती आहे. त्यामुळे हटके शेती करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यावर्षी पिवळी ज्वारीचा भाव शंभर रूपये किलोने विकली गेल्याचे सांगण्यात आले. एकाने वर्षाचा खर्च केवळ चिंचेच्या झाडेने उत्पन्न मिळवुन दिले. शंभर आंब्याचे झाडाच्या उत्पन्नाने वर्षभराचा खर्च काढून दिला. चार महीण्यात उत्पन्न देणाऱ्या काही बाबी आहेत त्याकडे लक्ष दिले पाहिजे. कोणताही व्यवसायाला व्यवसाय म्हणून पाहिला जात नाही तो पर्यंत उत्पन्न मिळत नाही. मुळात तसा विचार केला तर कर्ज घेताच कशाला, माफ करेल म्हणून, ते अतिषय चुकीचे आहे. कोणालाही कर्जाची परफेड करणे अतिषय कठिण जाते. शेतकऱ्यास तर अतिषय कठिण जाते. कारण शेतीतून मिळणारे उत्पन्न हे कर्जफेड करण्याइतके होत नाही. झालेला खर्च कधी-कधी निघणे आवघड होते ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे आपणही प.महाराष्ट्रासारखे शेतीचा प्रयोग केला पाहिजे. काही दोष असतील तर ते दूर केले पाहिजे. बँका असो किंवा कृषी विभाग, त्यापेक्षाने सरकारने आता वेगळी पद्धती आवलंबण्याची गरज आहे. बँका, कृषी विभाग, सरकारने मिळून ग्रामीण भागातील कर्ज व मदतीपेक्षा जमीन ताब्यात घ्यावी. शेतातील मातीचे परिक्षण करावे. मातीचा पोत जाणून घ्यावा. क्षाराचे प्रमाण जाणून घ्यावे. सामुहिक नांगरणी व पेरणी करावी. त्याच प्रमाणे उच्च दर्जाचे बियाणे वापरून पेरणी करावी. मिळणारे उत्पन्न जाहिर करावे. जर शास्त्रशुद्ध शेती केली व व्यावसाय म्हणून मेहनत घेतली तर शेती सारखा दुसरा व्यवसाय नाही. शेतकरी कोठेतरी चुकत आहे. ते दाखवुन देण्याची गरज आहे. कृषी प्रधान भारत आहे. अशा कृषीप्रधान देशातील शेती व शेतकऱ्याची स्थिती बिकट असेल तर ते शोभनिय नाही. त्यामुळे सतत कर्ज देणे व माफी देताना विविध कठिण निकष लावणे योग्य नाही. सरसकट माफीही मिळत नाही. गरज पडेल तेंव्हा बँकाही मदत करीत नाही. जे बँक अधिकारी आहेत त्यांना एकदा शासनाने प्रशिक्षण देण्याची गरज आहे. शेतकऱ्याशी कसे वागावे, कसे मार्गदर्शन करावे. या बाबत समज देण्याची गरज आहे. डिसीसी बँका ह्या शेतकऱ्याच्या समजल्या जातात, त्यांनी आता विचारपुर्वक शेतकऱ्याचे अर्थिक जीवनमान उंचविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. नसता आपल्याला कोणी वाली नाही असे वाटायाला नको. मुळात आपल्याकडे नदी आहे मात्र त्यापासून कॅनल, कालवे काढले गेले नाहीत. बंधारे आहेत त्यापासून पाणी शेतीस मिळण्यासाठी योग्य नियोजन नाही. पावसाळ्यात पाणी मिळते मात्र उन्हाळ्यात त्रास होतो. या उन्हाळ्यातील नियोजन बाबत सुसूत्रता दिसून येत नाही. शेती करणे आरोग्यासाठी लाभकारक आहे. शेतीत मेहनत होते. आर्थिक उत्पन्न प्राप्त होते. याला पाण्याचे नियोजन करून दाखववे लागेल. कर्ज माफी हा कायम उपायोजना नाही हे लक्षात घेता आता वेगळा विचार आर्थिक जीवनमान सुधारण्यासाठी ठोर प्रयत्नाची गरज आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना : ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी !

भारत हा कृषिप्रधान देश असून देशाच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्वाचा घटक आहे. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्यांना उपजीविका देण्याचे काम हा महत्वपूर्ण घटक करतो. म्हणूनच शेती हा घटक अन्न सुरक्षा,रोजगार आणि ग्रामीण विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावतो.

मात्र गेल्या काही वर्षांपासून सतत होणारे हवामान बदल, जमीन आणि पाण्याची टंचाई, बियाणे आणि खतांवरील वाढता खर्च आणि बाजारपेठेतील अनिश्चितता यामुळे शेतीसमोर अनेक आव्हाने दिवसेंदिवस वाढत आहेत. या समस्येचे निराकरण करण्यासाठी राज्य शासन अनेक उपाययोजना करत असते जसे की, शेतीचे उत्पादन वाढविणे, हवामान बदलास अनुकूल आणि शाश्वत शेतीला चालना देणे, सिंचन व्यवस्था आणि जलसंधारणात सुधारणा करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे. याशिवाय शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासाठी प्रोत्साहित करणे, शेतकरी गटांना बळकट करणे आणि बाजारपेठ उपलब्धतेत सुधारणा आणणे यासारखेही प्रयत्न केले जात आहेत.

मात्र आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी गेली काही वर्षे अनेक नैसर्गिक व आर्थिक संकटांचा सामना करत आहेत. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी गारपीट यामुळे शेतपिकांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान होत आहे. या सगळ्याचा परिणाम अनेकदा वाढता उत्पादन खर्च आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी शासनाकडून राबविण्यात येणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना महत्त्वाची ठरते. शेतकरी कर्जमुक्ती योजना म्हणजे शेतकऱ्यांनी बँका किंवा वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची संपूर्ण किंवा अंशतः माफी. शासनाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी होतो, आणि त्यांना नव्याने शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळते. कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांच्या मानसिक तणावात घट होते. तसेच त्यांच्या आर्थिक स्थैर्याला आधार मिळतो. कर्जमुक्तीनंतर शेतकरी नव्याने पीक कर्ज घेऊन शेतीमध्ये गुंतवणूक करू शकतात. यामुळे उत्पादन वाढीस मदत होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी मिळणार आहे.

तथापि, कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांच्या समस्यांवरील कायमस्वरूपी उपाय नाही. शेती क्षेत्रातील मूलभूत अडचणी दूर करण्यासाठी सिंचन सुविधा, पीकविमा, साठवणूक व्यवस्था, बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतीमालाला योग्य हमीभाव यांसारख्या उपाययोजनांची आवश्यकता आहे. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. त्याच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि शेती व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी कर्जमुक्तीसारख्या योजनांची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र, दीर्घकालीन विकासासाठी शाश्वत कृषी धोरणे आणि सर्वसमावेशक ग्रामीण विकास हाच खरा मार्ग आहे. शेतकरी सक्षम झाला तरच देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल आणि ग्रामीण भारताच्या विकासाला नवी दिशा मिळेल.

### राज्य शासनाकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना

राज्य शासनाकडून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविल्या जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, नमो शेतकारी महासन्मान निधी योजना, प्रधानमंत्री किसान मानधन योजना राबविल्या जातात. यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांना विविध प्रकारचे आर्थिक सहाय्य देण्यात येते. याशिवाय प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि हवामानावर आधारित फळपिक विमा योजना याद्वारे नैसर्गिक आपत्ती, कीड किंवा रोगांमुळे पीक आणि फळपिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येते. किमान आधारभूत किंमत योजना इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजार असे उपक्रम सुद्धा गेल्या काही वर्षात सुरू करण्यात आले आहेत.

### कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्ता (AI) याचा वापर

महाराष्ट्रात करण्यात येत आहे. राज्य शासनाने कृत्रिम बुद्धीमत्ता आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी 'महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धीमत्ता धोरण (महा कृषी एआय)' २०२५-२०२९ आणले आहे. याअंतर्गत शेतकऱ्यांना उपग्रह तंत्रज्ञान आणि भौगोलिक माहितीच्या आधारे पिकांची स्थिती, जमिनीचा ओलावा आणि इतर भौगोलिक घटकांचे विश्लेषण करणाऱ्या प्रणालीचे विकसन व अंमलबजावणी करण्यात येणार आहे. कृषी आणि अन्न उत्पादनाच्या खरेदी- व्रिकीसाठी एआय आधारित प्लॅटफॉर्म विकसित करण्यात येणार आहे.

### शेतकऱ्यांना देण्यात येणारी कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे साधन

शेतकऱ्यांना देण्यात येणारी कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे साधन आहे. या योजनेअंतर्गत ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी करण्यात येणार असून सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. ही राज्यातील सर्वात मोठी कर्जमुक्ती आहे.कर्जमुक्ती हा कायमस्वरूपी उपाय नसला तरी अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तो आवश्यक ठरतो. शेतकरी पुन्हा उभा राहावा आणि त्याला नव्याने कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा व्हावा, यासाठी कर्जमुक्तीकडे राज्य शासन एक महत्त्वाचे साधन म्हणून पाहते. राज्य शासनाने कर्जमाफीसंदर्भात तज्ज्ञ समिती नेमून या समितीला अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना, तसेच बँकिंग व्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्याची जबाबदारी दिली होती. समितीच्या अहवालाच्या आधारे काही निकष निश्चित करण्यात आले आहेत.

राज्य महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विविध कर्जमाफी योजना राबविल्या आहेत. दुष्काळ, अतिवृष्टी आणि इतर संकटांमुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाने विविध कालखंडात कर्जमुक्तीचे निर्णय घेतले. या योजनांमुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांना पुन्हा शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळाली.

शेतकऱ्यांच्या समस्या केवळ कर्जमाफीने पूर्णपणे सुटू शकत नाहीत. त्यासाठी पुढील उपाय महत्त्वाचे ठरणार आहेत:

* सिंचन सुविधांचा विस्तार
* पीकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी.
* शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर.
* साठवणूक व प्रक्रिया उद्योगांची उभारणी.
* शेतीमालाला योग्य व हमीभाव.
* शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांचे बळकटीकरण.
* कृषी शिक्षण व कौशल्य विकास.
* हवामान बदलाशी सुसंगत शेती पद्धतींचा प्रसार.

शेतकरी कर्जमुक्ती ही आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी दिलासादायक आणि आवश्यक उपाययोजना आहे. ती शेतकऱ्यांना नव्याने उभे राहण्याची संधी देणार आहे. याशिवाय ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होणार आहे. येत्या काळात शाश्वत कृषी विकासासाठी सिंचन, तंत्रज्ञान, बाजारपेठ, विमा आणि योग्य किंमत या घटकांचा समन्वय महत्वाचा ठरणार आहे. शेतकरी सक्षम झाला तरच देशाची अन्नसुरक्षा, ग्रामीण विकास आणि आर्थिक प्रगती अधिक बळकट होणार आहे.

**वर्षा फडके-आंधळे,**
**उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

# महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम,२०२६: अधिक प्रभावी, संतुलित, पारदर्शक

महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ हे माहितीच्या अधिकाराचे संकुचन करणारे नसून, माहिती अधिकार व्यवस्थेला अधिक प्रभावी, संतुलित, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख बनविण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेले आहेत. या नियमांमुळे कायद्याचा गैरवापर रोखण्यास मदत होईल, सार्वजनिक संसाधनांचा अधिक कार्यक्षम वापर होईल आणि सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या माहितीच्या अधिकाराचा अधिक परिणामकारक लाभ मिळेल. त्यामुळे सदर नियम हे माहितीच्या अधिकाराचे बळकटीकरण करणारे, लोकहित वृद्धिंगत करणारे आणि सुशासनाला चालना देणारे आहेत.

महाराष्ट्र शासनाने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००५ अधिसूचित केले होते. तथापि, गेल्या वीस वर्षांच्या कालावधीत शासनाच्या कार्यपद्धती, माहिती तंत्रज्ञान, नागरिकांच्या अपेक्षा तसेच माहितीच्या स्वरूपामध्ये मूलभूत बदल झाले आहेत. याशिवाय, या नियमामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या विविध सुधारणा स्वतंत्र स्वरूपात अस्तित्वात असल्याने नियमांची रचना गुंतागुंतीची बनली होती. या पार्श्वभूमीवर विद्यमान नियमांचे एकत्रीकरण करून, केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार नियम, २०१२ यांच्याशी सुसंगती निर्माण करून तसेच बदललेल्या परिस्थितीनुसार आवश्यक सुधारणा समाविष्ट करून महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ अधिसूचित करण्यात आले आहेत.

या नियमांचा उद्देश माहितीच्या अधिकारावर कोणत्याही प्रकारची मर्यादा आणणे नसून, माहिती अधिकार व्यवस्थेला अधिक कार्यक्षम, पारदर्शक, उत्तरदायी व तंत्रज्ञानसुसंगत बनविणे हा आहे. विशेषतः द्वितीय अपिलाची प्रक्रिया स्पष्ट करणे, स्वयंप्रेरणेने माहिती प्रकट करण्याच्या तरतुदींना बळकटी देणे, इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर वाढविणेतसेच माहिती अधिकार व्यवस्थेचा वाढता गैरवापर रोखण्यासाठी आवश्यक प्रशासकीय उपाययोजना करणे हे या नियमांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

### पाच वर्षांच्या कालावधीत २१,१३५ द्वितीय अपील दाखल

मागील काही वर्षांमध्ये राज्यातील काही मोजक्या व्यक्तींनी मोठ्या संख्येने माहिती अधिकार अर्ज व अपील दाखल केल्याचे निदर्शनास आले आहे. मागील पाच वर्षांच्या कालावधीत राज्यातील केवळ दहा अपीलकर्त्यांनी एकूण २१,१३५ द्वितीय अपील दाखल केल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. अशा प्रकारच्या मोठ्या प्रमाणातील अपीलांमुळे राज्य माहिती आयोगाकडील प्रलंबितता वाढते, आणि माहितीची खरी आवश्यकता असलेल्या सामान्य नागरिकांना त्यांच्या वैधानिक अधिकाराच्या वापरासाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागते. याचबरोबर सार्वजनिक प्राधिकरणांनाही त्यांच्या नियमित प्रशासकीय कामकाजातून मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ माहिती अधिकार विषयक कार्यवाहीसाठी वळवावे लागते.

### माहितीच्या अधिकाराच्या संरक्षणाची जबाबदारी

माहिती अधिकार अधिनियमाचा गैरवापर होत असल्याची बाब सर्वोच्च न्यायालय, विविध उच्च न्यायालये आणि केंद्रीय माहिती आयोग यांच्या निदर्शनासही आलेली आहे.आयसीएआयविरुद्ध शौनक एच. सत्या (२०११) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले आहे की, माहिती अधिकार अधिनियमाचा गैरवापर योग्य प्रकारे नियंत्रित केला गेला नाही तर पारदर्शकता व उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आलेली व्यवस्था उपद्रव आणि दुरुपयोगाचे साधन बनू शकते. तसेच सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच १५ जून २०२६ रोजी एसएलपी (उीश्र.) छे. १०२५७/२०२६ (रमेश कुमार बेहल विरुद्ध स्टेट ऑफ पंजाब एण्ड ऑदरस्) या प्रकरणात माहितीचा अधिकार कायद्याचा वापर व्यवसाय स्वरूपात केला जात असल्याची टिप्पणी केली आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकाराचे संरक्षण करतानाच त्याच्या गैरवापरावर नियंत्रण ठेवणे ही देखील शासनाची जबाबदारी आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम या कायद्याचा गैरवापर करून मोठ्या प्रमाणावर, पुनरावृत्ती स्वरूपाचे किंवा लोकहिताशी संबंध नसलेले अर्ज सातत्याने सादर केल्यास त्याचा परिणाम सार्वजनिक प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर होतो. सीबीएसईवि. आदित्यबंद्योपाध्याय (२०११) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले आहे की, सार्वजनिक प्राधिकरणांच्या सुमारे ७५ टक्के कर्मचाऱ्यांचा ७५ टक्के वेळ नियमित शासकीय कामकाज बाजूला ठेवून माहिती अधिकार अर्जावरील कार्यवाहीमध्ये खर्च होणे ही देशाला अपेक्षित असलेली परिस्थिती नाही. सार्वजनिक प्राधिकरणांची संसाधने ही करदात्या नागरिकांच्या पैशातून उपलब्ध होत असल्याने माहिती अधिकार कायद्याचा गैरवापर हा अप्रत्यक्षपणे सार्वजनिक निधीच्या अपव्ययास कारणीभूत ठरतो. त्यामुळे माहितीच्या अधिकाराचे संरक्षण करतानाच त्याच्या गैरवापरावर वाजवी नियंत्रण ठेवणे हे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे.

माहिती अधिकार अर्ज शुल्क, प्रथम अपील शुल्क, द्वितीय अपील शुल्क तसेच माहिती शुल्कामध्ये करण्यात आलेली वाढ ही महसूल वाढविण्यासाठी करण्यात आलेली नाही.महाराष्ट्र राज्यात माहिती अधिकार अर्जासाठीचे शुल्क आणि अपील शुल्क जवळपास वीस वर्षांपासून अपरिवर्तित होते. सुधारित शुल्क हे अजूनही नाममात्र स्वरूपाचे असून माहिती मिळविण्याच्या अधिकारावर कोणताही अवाजवी आर्थिक अडथळा निर्माण करीत नाही. उलट, व्यवस्थेचा गैरवापर करून मोठ्या प्रमाणावर अनावश्यक अर्ज व अपिले दाखल करण्याच्या प्रवृत्तीवर काही प्रमाणात नियंत्रण येण्यास मदत होईल आणि उपलब्ध संसाधने खऱ्या गरजवंत नागरिकांसाठी अधिक परिणामकारकपणे वापरता येतील.

### १५० शब्दांची मर्यादा ही अर्जातील मागणी स्पष्ट व संक्षिप्त करण्यासाठी

माहिती अधिकार अर्जासाठी १५० शब्दांची मर्यादाही तरतूद नवीन नसून २०१२ पासून अस्तित्वात आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ मध्ये केवळ पूर्वीच्या नियमांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. ही तरतूद न्यायालयीन परीक्षणात टिकून राहिलेली आहे. अनेक अर्ज अत्यंत विस्तृत व संदिग्ध स्वरूपाचे असल्यामुळे नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे हे समजत नाही. १५० शब्दांची मर्यादा ही माहितीच्या प्रमाणावर नसून अर्जातील मागणी स्पष्ट व संक्षिप्त करण्यासाठी आहे.

ओळखीचा पुरावा मागविणे हे माहितीच्या अधिकारावरमाहितीचा अधिकार अधिनियम हा केवळ भारतीय नागरिकांना लागू आहे. त्यामुळे अर्जदार भारतीय नागरिक असल्याची प्राथमिक खात्री करणे आवश्यक आहे. विद्यमान व्यवस्थेत खोट्या किंवा काल्पनिक नावाने अर्ज दाखल करण्यास प्रतिबंध करणारी कोणतीही प्रभावी यंत्रणा नव्हती. ओळखीचा पुरावा मागविण्याचा उद्देश नागरिकत्वाची खात्री करणे व गैरवापर रोखणे हा आहे.

अधिनियमानुसार दारिद्र्यरेषेखालील नागरिकांना शुल्कातून सूट देण्यात आली आहे. तथापि अमर्याद प्रमाणात माहिती विनामूल्य देणे अपेक्षित आहे, असा कोणताही उल्लेख अधिनियमात नाही. राज्य माहिती आयोगाने आपल्या २००९ तसेच २०११ च्या वार्षिक अहवालांमध्ये दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना विनामूल्य दिल्या जाणाऱ्या माहितीवर वाजवी मर्यादा निश्चित करण्याची शिफारस केली होती. आयोगाने अशा व्यक्तींना जास्तीत जास्त ५० पानांपर्यंतची माहिती विनामूल्य देण्याची शिफारस शासनास केली होती.या शिफारशींचा विचार करून शासनाने १ फेब्रुवारी २०१७ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकाद्वारे दारिद्र्यरेषेखालील अर्जदारांना पहिली ५० पाने विनामूल्य उपलब्ध करून देण्याबाबत कार्यपद्धती निश्चित केली होती. त्यामुळे सदर व्यवस्था नवीन नसून ती मागील अनेक वर्षांपासून प्रशासकीय स्तरावर अस्तित्वात आहे.

### पारदर्शकता व उत्तरदायित्व

या नियमांमधील सर्वात महत्त्वाची सुधारणा म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ४ अन्वये स्वयंप्रेरणेने माहिती प्रकट करण्याच्या तरतुदींना बळकटी देणे होय. शासनाच्या संकेतस्थळावर व सार्वजनिक क्षेत्रात जास्तीत जास्त माहिती उपलब्ध झाल्यास माहिती अधिकार अर्जांची आवश्यकता आपोआप कमी होईल. यामुळे नागरिकांना माहिती सहज उपलब्ध होईल, प्रशासनावरील अनावश्यक ताण कमी होईल आणि पारदर्शकता व उत्तरदायित्व यामध्ये वाढ होईल.माहिती मागण्याचे प्रयोजन नमूद करण्यासंबंधीची तरतूद नियम तयार करण्याच्या प्रारंभिक मसुद्यामध्ये विचाराधीन होती. अंतिम अधिसूचनेमध्येमहाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ मध्ये माहिती मागण्याचे प्रयोजन नमूद करणे बंधनकारक करणारी कोणतीही तरतूद समाविष्ट करण्यात आलेली नाही. तथापि, अनावधानाने माहिती अधिकार अर्जाच्या नमुन्यात 'माहिती मागण्याचे प्रयोजन' हा रकाना कायम राहिला होता. ही बाब निदर्शनास आल्यानंतर शासनाने तात्काळ दखल घेऊन महाराष्ट्र माहितीचा अधिकार (प्रथम सुधारणा) नियम, २०२६ द्वारे हा रकाना वगळला आहे. त्यामुळे महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ अंतर्गत माहिती मागण्याचे प्रयोजन नमूद करण्याची कोणतीही आवश्यकता अथवा बंधन अस्तित्वात नाही.

०००

**गजानन पाटील/स.सं.**

# शेतकऱ्यांचा राजा : राजर्षी शाहू महाराज

राजर्षी शाहू महाराजांनी शेतीविकासाला चालना देतानाच शेती सिंचनाखाली आणल्याशिवाय शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार नाही, याची स्पष्ट कल्पना असल्यामुळे पाणी वापराबाबत योग्य धोरण ठरविले. शेती पाण्याखाली आणण्यासाठी प्रयत्न केले.

डॉ. प्रवीण बनसोड

राजर्षी शाहू महाराजांनी शेतीविकासाला चालना देतानाच शेती सिंचनाखाली आणल्याशिवाय शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार नाही, याची स्पष्ट कल्पना असल्यामुळे पाणी वापराबाबत योग्य धोरण ठरविले. शेती पाण्याखाली आणण्यासाठी प्रयत्न केले.

शेतीच्या विकासावरच देशाचा विकास अवलंबून असतो, त्याची पुरेपूर जाणीव असल्याने शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानात शेतीकडे जाणीवपूर्वक लक्ष्य दिले. दुष्काळ, गुरांचे आजार, अल्प उत्पादन याकडे लक्ष पुरवून शाहू महाराजांनी शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासाच्या योजना राबविल्या. राज्य कारभार स्वीकारल्यानंतर छ. शाहू महाराजांनी सर्वप्रथम शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांचे प्रश्न समजून घेतले. शेतीच्या दुरवस्थेमुळे शेतकऱ्यांचे दारिद्र्य वाढून त्यांचे जीवनमान खालावते, याची जाणीव झाल्याने शेतीची उत्पादकता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न शाहू महाराजांनी सुरू केले. शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी आधुनिक तंत्र आत्मसात केले पाहिजे, असे मत छ. शाहू महाराजांनी मांडले आणि १९१२ मध्ये कोल्हापूर येथे 'किंग एडवर्ड ग्रिकल्चर इन्स्टिट्यूट' स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून सुधारीत बी-बियाणे, खते, पशुपालन याची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचू लागली. अद्ययावत शेती, अवजारांचे प्रदर्शन भरवून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक मिळू लागले. शिवाय आधुनिक शेती उपकरणांचे संग्रहालय सुद्धा शाहू महाराजांनी निर्माण केले.

शेतकऱ्यांनी वनौषधी आणि इमारती लाकडाची लागवड केल्यास त्यांचे उत्पन्न वाढू शकेल, हे ध्यानात आल्याने महाराजांनी साग, हिरडा, बेहडा, आंबा, फणस, काजू व इतर वनौषधींची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. साबुदाणा तयार होणाऱ्या टॅपिओकाची शेती करण्यासाठी विशेष प्रोत्साहन महाराजांनी दिले. शेतकऱ्यांना जाचक ठरणाऱ्या वनकायदा आणि पतधोरणात शाहू महाराजांनी तातडीने बदल करून शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. शेतकरी सावकारांकडून कर्ज घेत असल्याने आणि अव्वाच्या सव्वा व्याज देत असल्याने शेतकरी नाडला जातो, म्हणून शाहू महाराजांनी १८९५ मध्ये शेतकऱ्यांना दरबारामार्फत कर्जपुरवठा करण्यास सुरुवात केली. १ जून १९९९ रोजी एक वटहुकूम जारी करून सावकारांवर अनेक निर्बंध आणले, त्यानुसार शेतकऱ्याच्या शेतातील उभी पिके जप्त करण्यावर बंदी आणण्यात आली. शिवाय शेतकऱ्यांच्या जप्त केलेल्या जमिनी सोडविण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यास सुरुवात केली.

शेतकऱ्यांनी नगदी पिकाकडे वळले पाहिजे, असे शाहू महाराजांना वाटत असल्यामुळे त्यांनी पन्हाळा येथे चहा, कॉफी, रबर याचे खास मळे तयार केले, सोबतच बटाटे, कापूस, ताग, रेशीम यांसारखी पिके घेण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त केले, त्यामुळे चहा उत्पादनाचा प्रयोग मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाला. 'पन्हाळा चहा नं. ४' या नावाने नवीन ब्रँड प्रसिद्ध झाला, परंतु महाराजांच्या निधनानंतर हा ब्रँड बंद पडला. मानवी जीवन आणि शेती याचा अन्योन्यसंबंध सांगताना शाहू महाराज म्हणतात, कृषी कर्मापासून दुहेरी उन्नती होते. स्वतःला सुख तर होतेच, शिवाय सर्व मनुष्यजातीलाही सुख मिळते. कृषी कर्म करताना क्षात्र धर्माला बाधा येते, ही समजूत निखालस आहे. श्रमाची प्रतिष्ठा जगात मोठी, फारच मोठी आहे. शेती ही श्रमाची प्रतिष्ठाच आहे.

महाराजांच्या कारकीर्दीत शेती हाच प्रमुख व्यवसाय होता, परंतु शेतीचे लहान-लहान तुकड्यात विभाजन झाले होते. वाटणी व्यवहारामुळे अशा लहान तुकड्यांची निर्मिती झाली होती. लहान तुकड्यांची व्यवस्था बदलून त्याचे रूपांतर मोठ्या शेतीमध्ये व्हावे म्हणजे शेती व्यवसाय किफायतशीर



होईल, असे शाहू महाराजांचे मत होते. हे मत त्यांनी बोलून दाखविले आणि तशी कृतीही केली. माणगावच्या परिषदेमध्ये भाषण करताना महाराज म्हणतात, तुम्ही साधारण माणशी दहा एकर जमीन वाट्याला येईल असे तुमच्या म्हारकीचे तुकडे करा आणि हे उत्पन्न तुमच्यातील वडील असणाऱ्या व्यक्तीकडे चालवायला द्या. म्हणजे सर्वांना अर्धपोटी रहावे लागते ते वाचेल. महाराजांनी आपले मत केवळ भाषणा-पुरते मर्यादित न ठेवता तशी कृती केली. त्यासाठी त्यांनी १९१३ ला अविभाज्य इनामाचा कायदा केला. त्यानुसार वाटणी करता येणार नाही, असे ठरविले. राजर्षी शाहू महाराजांनी शेतीचे विविध प्रयोग आणि संशोधनाला चालना दिली. जुन्या अवजाराच्या ठिकाणी नवी अवजारे, प्रत्यक्ष प्रात्यक्षिक, प्रदर्शने, शेतकी शाळा असे अनेक उपक्रम छत्रपती शाहू महाराजांनी राबविले. पन्हाळा व भुदरगड येथे चहा व कॉफीची लागवड, तर वेलदोडे, कॉफी, रबर, ताग, बटाटे, अंबाडी, लाख, ट्रॅपिओका, कंबोडियन, कापूस इत्यादींची लागवड करण्यासाठी प्रोत्साहन व सहकार्य दिले.

शाहू महाराजांची जलनीती : राजर्षी शाहू महाराजांनी शेतीविकासाला चालना देतानाच शेती सिंचनाखाली आणल्याशिवाय शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार नाही, याची स्पष्ट कल्पना असल्यामुळे पाणी वापराबाबत योग्य धोरण ठरविले. शेती पाण्याखाली आणण्यासाठी नव्या विहिरी, तलाव, बंधारे आणि कालवे बांधायला सुरुवात केली. त्यापैकी त्यांच्या दूरदृष्टीचा उत्कृष्ट नमुना म्हणजे 'राधान-गरी धरण' होय. आज या धरणाला शंभरपेक्षा जास्त वर्षे होऊनही त्याचे बांधकाम उत्कृष्ट आहे. महाराष्ट्रातील इतर भागाप्रमाणे कोल्हापूर विभागातही दुष्काळाच्या झळा सोसाव्या लागत. त्यामुळे दुष्काळ निर्मूलनासोबतच भविष्यकालीन पाणी नियोजनाचे धोरण शाहू महाराजांनी राबविले. रयतेच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करतानाच शेतीच्या सिंचनाची व्यवस्था महाराजांनी केली. १९१५-१६ या वर्षातील अहवालावरून असे दिसते की, कोल्हापूर संस्थानात नद्यांमधून ३९,७८३ एकर, विहिरीमधून ३९,८४५ एकर आणि तलावांमधून २३२ एकर अशी एकूण ७९,८६० एकर क्षेत्रावरील शेतीच्या सिंचनाची सोय होत होती. हे क्षेत्र अधिक वाढण्यामागे शाहू महाराजांची दूरदृष्टी आणि प्रयत्नपूर्वक नियोजन हे होते. भूजलातून पाणी उपसा न करता नदी, तलावांतील पाणी वापरण्यावर त्यांचा भर होता म्हणून १९०९ मध्ये राधानगरी धरण प्रकल्प हाती घेण्यात आला. १९१८ पर्यंत या धरणाच्या कार्यासाठी शाहू महाराजांनी १४ लाख रुपये खर्च केले. परंतु महाराजांच्या कारकीर्दीत हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. पुढे राजाराम महाराजांनी हा प्रकल्प पूर्ण करून राजर्षी शाहू महाराजांचे स्वप्न पूर्ण केले. जमिनीवर पडणारे पावसाचे पाणी वाहून न जाता योग्य प्रकारे साठविले तरच भविष्यातील दुष्काळाला तोंड देता येणे शक्य आहे, याची पुरेशी कल्पना असल्याने राजर्षी शाहू महाराजांनी नवीन सार्वजनिक तळी बांधण्याची मोहीम हाती घेतली. दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी १९०२ मध्ये पाटबंधारे धोरण जाहीर केले. त्यासाठी पाटबंधारे खाते निर्माण करून खास इरिगेशन ऑफिसरची नेमणूक केली. आपल्या संस्थानात जलनीती आखण्यासाठी पाटबंधारे खात्यामार्फत प्रत्येक गावाची तपशीलवार पाहणी करून शाहू महाराजांनी धोरण आखले. सिंचन प्रकल्पाबाबत तर त्यांची महत्त्वाकांक्षा आकाशाला गवसणी घालणारी होती. कर्नल फेरिस या इंग्रज अधिकाऱ्यास लिहिलेल्या पत्रात शाहू महाराज म्हणतात, आपण येथून निघून गेल्यावर, मी सुमारे २० बंधारे बांधले. पण माझी महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली नाही म्हणून मी आता एक मोठा सिंचन प्रकल्प हाती घेणार आहे आणि टंचाईवर मात करणार आहे. घराघार पाण्यामुळे समृद्धी नांदायला हवी.

शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीकरिता सिंचन आणि शेती शिक्षणाची गरज ओळखून त्याप्रमाणे कृती करणारे राजर्षी शाहू महाराज यांचा एक जाहीरनामा मुळातून वाचण्यासारखा आहे. या जाहीरनाम्यातून शाहू महाराजांची सिंचनाबाबतची दूरदृष्टी दिसून येते. शाहू महाराजांच्या या जलनीतीचा प्रत्यक्ष परिणाम पुढील काळात दिसून आला. स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण करून भविष्यकालीन दुष्काळाला थोपविण्यासाठी महाराज प्रयत्नशील होते. त्यामुळेच १९०६ साली संस्थानात असलेल्या ११ हजार ७०० विहिरींमध्ये वाढ होऊन १९२० पर्यंत ९८ हजार ८०० इतक्या विहिरी झाल्या. शिवाय शहापूर रुकडी, शिरोळ या परिसरात २० नवीन तलाव बांधण्यात आले. शाहू महाराजांच्या या शेती व जलनीतीचा अवलंब करण्याची आजही गरज आहे.

## कुशल मार्गदर्शन

एका प्रयोगशाळेत काही विद्यार्थी प्रयोग करत होते. यावेळी दोन विद्यार्थ्यांकडून मोठी चूक झाली. त्यांना वाटले की, आता त्यांना कठोर शिक्षा मिळेल. प्रयोगशाळा त्यावेळी प्रसिद्ध वैज्ञानिकाने काही दिवसांपूर्वीच सुरु केली होती. दोन्ही विद्यार्थी घाबरत-घाबरत त्यांच्याजवळ गेले. वैज्ञानिकाने त्यांना घाबरलेले पाहून विचारले, काय झाले? यावर एक विद्यार्थी घाबरत-घाबरत म्हणाला, सर इलेक्ट्रिक मिटर खराब झाले आहे. यामुळे त्याच्यात खूप जास्त करंट पसरला आहे. हे ऐकून वैज्ञानिक सुन्न झाला. नंतर त्याने स्वत:ला सावरले आणि म्हणाला, अरे फक्त एवढ्या छोट्या गोष्टीसाठी तुम्ही दोघे एवढे परेशान आहात. विद्यार्थी जेव्हा प्रयोग करतात तेव्हा अशा गोष्टी घडतच असतात. जर विद्यार्थ्यांनी चूका केल्या नाहीत तर ते शिकतील कसे? परंतु भविष्यात प्रयोग करताना मात्र अवश्य सावधानी बाळगायला हवी. ज्यामुळे अशा प्रसंगापासून वाचता येईल. विद्यार्थ्यांनी वैज्ञानिकाचे म्हणणे ऐकूल्यानंतर वैज्ञानिकाप्रती त्यांच्या मनात आदर निर्माण झाला. तथापि, जी चूक या दोन्ही विद्यार्थ्यांकडून झाली होती. त्यामुळे एका खूप महागडे आणि महत्त्वाचे यंत्र पूर्णपणे जळाले होते आणि ते यंत्र सध्या बाजारात उपलब्ध नव्हते. एवढेच नव्हे तर ते यंत्र जळाल्यामुळे अनेक महत्त्वपूर्ण प्रयोगही थांबले होते. परंतु वैज्ञानिक या नुकसानावर न चिडले न त्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांवर राग व्यक्त केला. तर दोन्ही विद्यार्थ्यांना भयमुक्त केले. त्यानंतर ज्यांनीही हा प्रसंग ऐकला. त्यांनी वैज्ञानिकाची स्तुती केली.

## एकदा करून ठेवा, १५ दिवस खा!
## कडिपत्त्याच्या चटणीची सोपी रेसिपी

कडिपत्ता, उडीद डाळ आणि चणा डाळ वापरून तयार करा १५ दिवस टिकणारी सुकी चटणी. चवदार, पौष्टिक आणि आरोग्यासाठी फायदेशीर असलेली ही सोपी रेसिपी जाणून घ्या.

रोजच्या जेवणात एखादी चवदार चटणी असेल तर साधंसुधं जेवणही रुचकर वाटतं. विशेष म्हणजे चटणी ही केवळ चव वाढवणारी नसून शरीराला आवश्यक पोषक घटकही पुरवते. कडिपत्ता, उडीद डाळ आणि चणा डाळ यांचा वापर करून तयार होणारी ही सुकी चटणी चवदार तर आहेच, शिवाय आरोग्यासाठीही फायदेशीर ठरू शकते. एकदा करून ठेवली की ही चटणी जवळपास १५ दिवस टिकते.

साहित्य

२ वाट्या कडिपत्त्याची पाने

३ चमचे उडीद डाळ

२ चमचे चणा डाळ

१० ते १२ सुक्या लाल मिरच्या

१ टीस्पून जिरे

१ टीस्पून धने

थोडी चिंच

१० ते १२ लसूण पाकळ्या

चवीनुसार मीठ

एकदा करून ठेवा, १५ दिवस खा! कडिपत्त्याच्या चटणीची सोपी रेसिपी

संध्याकाळी जंकफूड खाण्याची सवय सोडा, ५ मिनिटांत तयार होणारे 'हे' ६ हेल्दी स्नॅक्स नक्की ट्राय करा

कृती-सुरुवातीला कढई गरम करून त्यात उडीद डाळ आणि चणा डाळ मंद आचेवर छान भाजून घ्या. डाळी हलक्या लालसर झाल्यावर बाजूला काढा. त्याच कढईत सुक्या लाल मिरच्या परतून घ्या. त्यानंतर जिरे आणि धने घालून भाजा. आता स्वच्छ धुवून पूर्ण कोरडी केलेली कडिपत्त्याची पाने कढईत घालून परता. सर्व



साहित्य थंड झाल्यानंतर मिक्सरच्या भांड्यात घाला. त्यात चिंच, लसूण पाकळ्या आणि मीठ घालून मिश्रण बारीक वाटून घ्या. तयार चटणी हवाबंद डब्यात भरून ठेवा.

कडिपत्ता आरोग्यासाठी का फायदेशीर?

कडिपत्त्यामध्ये लोह, कॅल्शियम, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे केसांच्या आरोग्यासाठी, हाडांच्या मजबुतीसाठी आणि पचनक्रिया सुधारण्यासाठी तो उपयुक्त मानला जातो. रोजच्या आहारात कडिपत्त्याचा समावेश केल्यास शरीराला अनेक आवश्यक पोषक घटक मिळू शकतात.

एकदा करून ठेवा, १५ दिवस खा! कडिपत्त्याच्या चटणीची सोपी रेसिपी

वजन नियंत्रणासह त्वचेलाही मिळेल नैसर्गिक चमक; ट्राय करा हे हेल्दी ड्रिंक

डाळींचाही मिळतो अतिरिक्त फायदा-या चटणीत वापरलेल्या उडीद डाळ आणि चणा डाळ प्रथिनांचे चांगले स्रोत मानले जातात. त्यामुळे ही चटणी केवळ चव वाढवत नाही, तर शरीराला ऊर्जा आणि पोषणही देते. भाकरी, पोळी, वरण-भात किंवा तुपासोबतही ही चटणी खाता येते.

साठवणूक कशी करावी?

चटणी पूर्णपणे थंड झाल्यानंतरच डब्यात भरावी. फ्रिजमध्ये ठेवली तर ही चटणी सुमारे १५ दिवस चांगली टिकू शकते. त्यामुळे व्यस्त दिनक्रमात झटपट खाण्यासाठी हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




मटन किंवा मांसाहारी पदार्थातील लिवर किडनी असे भाग टाळावेत. आहारात सोयाबीनचाही उपयोग करता येईल. तसेच दूध व दुधाचे पदार्थ जसे दही किंवा पनीर तयार करताना साय काढून केल्यास उत्तम.तेल-तूप : हृदयरोग म्हटल्यावर आपल्या सर्वांना माहिती आहे की, रक्तवाहिनीत चरबी साठून रक्त प्रवाहास अडथळा निर्माण झाल्यास हार्ट अ‍ॅटॅक येऊ शकतो. हा धोका टाळण्यासाठी योग्य प्रमाणातच आहारात तेल व तुपाचा समावेश करावा. प्रमाणाव्यतिरिक्त कुठले तेल वापरतो यानेदेखील फरक पडतो.

## २ Joke — विनोद





आगगाडीत तिकीट तपासणीस येतात. एक प्राध्यापक तिकीट शोधतात. खूप वेळ होतो. अखेर तपासणीस म्हणतात, ङ्गजाऊ द्या. नका शोधू. मला खात्री आहे, तुम्ही तिकीट काढले असणार.फ त्यावर प्राध्यापक म्हणतात, ङ्गतरी मला शोधायलाच हवे, कारण उतरायचे कुठे ते कसे कळणार.

## ३ Message — संदेश



Old : pehla pehla pyar hai, aayi bahar hai, aaja more sajan tera Intazar hai.
New : Duja teja pyar hai, dil bekarar hai, aaja mere sajana verna Chautha tai-yaar hai…!

## ४ Thought — सुविचार




चूक ही चिवट वनस्पती आहे, ती वाटेल त्या भूमीत फोफावते. – मार्टिन रूपर

**संस्कृत सुभाषित**

मित्रं वा बन्धुं वा वैवातिप्रणयपीडितं कुर्यात।
स्वम वत्समतिपिबन्तं विषाण कोट्याक्षिपति धेनु:।।

अर्थ : मित्राच्या किंवा आप्ताच्या प्रेमाचा फार फायदा घेऊ नये. स्वत:चे वासरू जर जास्त दूध पिऊन त्रास देत असेल तर गाय स्वत: त्यालाही शिंगानी ढोसून दूर करते.

## मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. डोंगरराजीतील साहसी पर्यटन
४. गुणज्ञ
८. वक्र
११. पानाचे दुकान
१२. अफूचे बी
१४. महिना
१५. पहारेकरी
१८. विपुलता
२०. हस्तेपरहस्ते
२२. जिवलग मैत्रिण
२३. निकट
२५. रडगाणे, रडकथा
२६. अरण्य
२८. वृक्ष
३०. होडी चालवणारा
३२. किल्ली
३४. घनिष्ठ संबंध
३६. समुद्राच्या लाटांचा आवाज
३८. दर पंधरा दिवसांनी प्रसिद्ध होणारे नियतकालिक
३९. '-- जनाब ने पुकारा नहीं, क्या मेरा साथ भी गंवारा नहीं'
४०. मीठ
४१. थोडेसे
४२. जन्मदाता
४३. हेतू, कारण, स्वार्थ
४५. रेती
४६. विष्णुपत्नीचे एक नाव
४८. वर्ष, साल
४९. लिंबूसाखरेचे थंड पेय
५२. अंगावर येणारा काटा
५४. पादत्राण
५५. गहन
५६. स्वर्गाचे दोन पहारेकरी
५८. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
६०. घास पण गवत नव्हे
६१. एक चतुर्थांश
६२. व्रत, नेम
६४. उदर
६५. जयघोष
६७. अनुमती
६९. सुंभाबरोबर न जळणारा
७१. मोठा जाड अंगरखा
७२. तांब्या-पितळेची भांडी तयार करणारा
७४. '-- ---- म्हणतील हाय, हाय! मी जाता राहील कार्य काय?' (भा.रा.तांबे)
७७. गवंडी
७८. अचेतन शरीर
७९. पार्वतीचे उग्र रूप
८०. वशिला
८१. सोशिकपणा

### उभे शब्द

१. आस्था, फिकीर
२. तारणारा
३. आयुध
४. मद्य तयार करणारा-विकणारा
५. रुक्ष
६. सेवक
७. लचकत-मुरडत अशी चाल अथवा चालण-ारी
९. जास्तीतजास्त
१०. मच्छर
११. जपून ठेवलेली गोष्ट
१३. अखंड
१६. मोठे भांडण
१७. राममंदिरातील मारुतीचे रूप
१९. जीव, प्राण, चैतन्य
२०. चलनवलन
२१. अति खाण्यामुळे पोटाला बसणारी ओढ
२४. उगीच
२७. आवर घालणारी वादी
२९. शंभर पैशाचे नाणे
३१. प्रवाशांना घेऊन अधांतरी उडणारे
३३. डोंगरातील लांब गुहावजा जागा
३५. खुमारी
३७. उष्णतेमुळे पायाला भेगा पडण्याचा रोग
४१. आकाश
४२. पाण्याचा साठा असलेली जागा
४३. अंत:करण
४४. हावरटपणा
४७. इंद्रिय
४८. हुक्की, लहर
५०. मजबूत, भक्कम
५१. चरण
५३. राजसुख
५५. डोक्याला झालेली खोल जखम
५६. मनातली आग
५७. स्थानापन्न (होणे)
५९. उत्सवाचे दिवस
६१. चबुतरा
६३. भेग, चीर
६६. अंजन
६८. रविंद्रनाथ टागोरांचा काव्यसंग्रह
७०. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या आपण सगळेच
७१. नाजूक
७३. पत्र
७४. एक गळित धान्य
७५. वारा
७६. यज्ञ
७७. पौर्णिमा

### आडवे उत्तरे

१.पर्वतारोहन ४.कदरदान ८.वाकडा ११.ठेला १२.खसखस १४.मास १५.रखवालदार १८.रेलचेल २०.हातोहात २२.सखी २३.लगत २५.रड २६.जंगल २८.तरू ३०.नाविक ३२.चावी ३४.सलगी ३६.गाज ३८.पाक्षिक ३९.माना ४०.लवण ४१.अंमळ ४२.जनक ४३.मतलब ४५.वाळू ४६.कमला ४८.सन ४९.सरबत ५२.शहारा ५४.वहाण ५५.खोल ५६.जयविजय ५८.कसकस ६०.कवळ ६१.पाव ६२.वसा ६४.पोट ६५.जयजयकार ६७.परवानगी ६९.पीळ ७१.कोट ७२.तांबट ७४.जन पळभार ७७.राज ७८.शव ७९.महाकाली ८०.लग्गा ८१.सहनशीलता

### उभे उत्तरे

१.पर्वा २.तारणहार ३.हत्यार ४.कलाल ५.रखरखीत ६.दास ७.नखरेल ९.कमाल १०.डास ११.ठेवा १३.सलग १६.खडाजंगी १७.दास १९.चेतना २०.हालचाल २१.तडस २४.हकनाक २७.लगाम २९.रुपाया ३१.विमान ३३.विवर ३५.लज्जत ३७.जळवात ४१.अंबर ४२.जलाशय ४३.मन ४४.लसलस ४७.अवयव ४८.सणक ५०.बळकट ५१.पाय ५३.राणीव ५५.खोक ५६.जळजळ ५७.विराजमान ५९.सणवार ६१.पार ६३.सापट ६६.काजळ ६८.गीतांजली ७०.करदाता ७१.कोमल ७३.टपाल ७४.जवस ७५.पवन ७६.होम ७७.राका




# आई-वडिलांचा दोष नाही, सिया गोयलबद्दल कंगना रणौत यांची पोस्ट; म्हणाल्या, एखाद्या कुटुंबाकडे..

लोहगड येथील केतन अग्रवाल हत्या प्रकरणावर अभिनेत्री व भाजप खासदार कंगना रणौत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नेमकं काय म्हणाल्या कंगना...? लोहगड येथे अपघात झाल्याचा बनाव रचून सिया गोयल या २० वर्षीय तरुणीने रिअल इस्टेट व्यावसायिक असलेल्या २६ वर्षीय केतन अग्रवालची हत्या केली. या हत्येत तिला तिचा प्रियकर चेतन चौधरी याने मदत केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात २० वर्षीय सिया गोयल आणि तिचा कथित प्रियकर चेतन चौधरी यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलिस घेत आहेत. यावर अभिनेत्री व खासदार कंगना रणौत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सोशल मीडियावर पोस्ट करत कंगना यांनी मुलांचे पालन पोषण आणि त्यांची संगत यावर भाष्य केले आहे.

पुण्यातील हत्येच्या घटनेवर अभिनेत्री आणि भाजपा खासदार कंगना रणौत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. २६ जून रोजी शुक्रवारी इन्स्टाग्राम स्टोरी शेअर करत कंगना रणौत यांनी या घटनेवर भूमिका मांडली. मुलांच्या अशा कृत्यांसाठी फक्त त्यांच्या पालकांनाच जबाबदार धरले जाऊ नये असे मत कंगना यांनी मांडले आहे. सध्याच्या पिढीवर सोशल मीडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांचा मोठा प्रभाव असून



त्यांच्यासह असणाऱ्या मित्र-मैत्रिणींचा सहवासाचादेखील परिणाम होत असल्याचे मत कंगना यांनी व्यक्त केले आहे.

मुलांवर नेमका कोणाचा प्रभाव आहे? - कंगना

कंगना रणौत यांनी पोस्टमध्ये लिहिलं, आजकाल एखाद्या कुटुंबाकडे, घराकडे किंवा आई-वडिलांकडे पाहून त्यांच्या मुलांवर कोणते संस्कार झाले आहेत, याचा अंदाज लावणे कठीण झाले आहे. सध्याच्या काळात मुलांवर नेमका कोणाचा प्रभाव आहे? मुलं कोणाबरोबर वेळ घालवतात, सोशल मीडियावर त्यांना कोण प्रभावित करतं, एआय व खऱ्या आयुष्यात त्यांच्यावर कोणाचा प्रभाव पडतो, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. पुढे त्यांनी लिहिलं, मुलांच्या प्रत्येक गोष्टीसाठी पालकांना दोष देता येणार नाही. कारण आजच्या काळात लोक वेगवेगळी आयुष्ये जगत असतात. स्वतःची आदर्श प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न करतात आणि खरा स्वभाव कसा आहे किंवा त्यांची स्वतःची काय मत आहेत यापेक्षा इतरांच्या नजरेत ते कसे दिसतात, याला जास्त महत्त्व देतात. त्यामुळे मुलांच्या कृत्यांसाठी त्यांच्या कुटुंबाला किंवा पालकांना जबाबदार धरणे योग्य ठरणार नाही.

कंगना रणौत यांची सोशल मीडिया पोस्ट हेही वाचा

नेमकं काय आहे लोहगड हत्या प्रकरण?

पुण्यातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांचा २६ वर्षीय मुलगा केतन अग्रवाल याचा लोहगड किल्ल्यावर संशयास्पद मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास करताना त्याची होणारी पत्नी सिया गोयल हिच्यावर संशय घेण्यात आला आणि पोलिसांनी केलेल्या तपासामध्ये सियानेच हा हत्येचा कट रचल्याचे समोर आले. २० वर्षीय सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांनी



मिळून हा पूर्वनियोजित खून केल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. १८ जून रोजी सिया ही केतनला ऐतिहासिक लोहगड किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी घेऊन गेली. एका निर्जन आणि खोल दरी असलेल्या ठिकाणी पोहोचताच, सिया आणि तिचा प्रियकर चेतन यांनी मिळून केतनला थेट ४०० फूट खोल दरीत ढकलून दिले. सियाने अपघाताचा बनाव करून पोलिसांना फोटो काढताना पाय घसरल्याचे खोटे सांगितले. मात्र, सिया गोयलनेच हे हत्याकांड घडवून आणल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

# जॉन अब्राहमची क्रिकेटमध्ये एन्ट्री !

जॉन अब्राहम आता या टीमचा झाला मालक

John -braham Enters in Cricket : अभिनेता शाहरुख खान तसेच अभिनेत्री प्रीती झिंटा यांच्या पाव-लावर पाऊल ठेवत बॉलीवूड अभिनेता जॉन अब्राहमने क्रिकेटच्या दुनियेत मोठं पाऊल टाकलं आहे. जॉन अब्राहमने युरोपियन टी २० प्रीमियर लीगमधील एख फ्रेंचायजी खरेदी केली आहे. तो आता ETPL मधील रॉटरडॅम डॉकर्सचा सहमालक झाला आहे. जॉन अब्राहम सोबतच आता क्रिकेट जगतातील दिग्गज जाँटी ऱ्होड्स, फाफ ड्युप्लेसिस, क्लासने आणि मॅनेजिंग पार्टनर म्हणून मधुकर श्री देखील सामील झाले आहेत.रॉटरडॅम डॉकर्स २६ ऑगस्ट ते २० सप्टेंबर २०२६ (ETPL) दरम्यान आयोजित होणाऱ्या युरोपियन टी२० प्रीमियर लीगच्या (ईटीपीएल) पहिल्याच हंगामात स्पर्धा करणाऱ्या सहा फ्रँचायझी संघांपैकी एक आहे. जॉन अब्राहम एका नामांकित मालकी आणि नेतृत्व गटामध्ये सामील झाला आहे. या गटामध्ये मॅनेजिंग पार्टनर (व्यवस्थापकीय भागीदार) मधुकर श्री यांच्यासोबत जाँटी रोड्स, फाफ डू प्लेसिस आणि हेनरिक क्लासेन या दिग्गज क्रिकेटपटूंचा समावेश आहे.जॉन अब्राहम रॉटरडॅम संघात सहमालक झाल्यानंतर म्हणाला की, मक्रिकेट लोकांना जोडणे, प्रेरित करणे आणि नव्या संधी उपलब्ध करून देण्याची क्षमता आहे. जॉनच्या मते युरोप सध्या क्रिकेटसाठी एक वेगाने वाढती बाजारपेठ आहे. रॉटरडॅम डॉकर्सकडे एक तगडे व्हिजन, नेतृत्व आणि मोठी



महत्वकांक्षा आहे. यामुळं या फ्रेंचायजीची एक खास ओळख निर्माण होऊ शकते, असं त्याच मत आहे.दरम्यान, एढझड मध्ये एडिनबर्ग, ग्लासगो, ॲमस्टरडॅम, डब्लिन, बेलफास्ट आणि रॉटरडॅम या ६ शहरातील संघांचा समावेश आहे. ही लीग संपूर्ण युरोपमधील क्रिकेटपटूसाठी एक नवीन आणि रोमांचक अध्याय सुरु करण्यासाठी प्रेरणादायी ठरेल. या लीगमध्ये एकूण ३२ सामने खेळले जातील. ही लीग नवीन तयार होणाऱ्या युरोपियन खेळाडूंना आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील मोठ्या दिग्गजांसोबत खेळण्यासाठी जा-गतीक दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध करून देतील सोबतच आयर्लंड, स्कॉटलंड आणि नेदरलँड्समध्ये क्रिकेट या खेळाला प्रोत्साहन मिळू शकणार आहे.

दैनंदिन जीवनात आपण खात असलेल्या अन्नातून शरीरात जाणाऱ्या रसायनांमुळे आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा मुद्दा आता रुपेरी पडद्यावर मांडला जाणार आहे. द इंडिया स्टोरी : स्लो पॉइझन इन प्रोग्रेसफ (The India Story: Slow Poison in Progress’) या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला असून, त्यामध्ये कीटकनाशकांच्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या कीटकनाशकांचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विशेषतः लहान मुले आणि



# द इंडिया स्टोरीचा टीझर प्रदर्शित, चित्रपट येणार प्रेक्षकांच्या भेटीला

वापरामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या चित्रपटात अभिनेता श्रेयस तळपदे आणि अभिनेत्री काजल अग्रवाल प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत.

टीझरमध्ये शेतीमध्ये मोठ्या तरुणांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्न या कथेत मांडले गेले आहेत. अन्ना-तून शरीरात जाणाऱ्या रसायनांमुळे भविष्यात कोणते धोके निर्माण होऊ शकतात, याकडे चित्रपट लक्ष वेधतो. या चित्रपटात श्रेयस तळपदे एका वडिलांची भूमिका साकारत आहे. आपल्या मुलीला गमावल्यानंतर तो या समस्येविरोधात लढा देताना दिसणार आहे. या भूमिकेबद्दल बोलताना श्रेयसने सांगितले की, ही कथा केवळ मनोरंजनासाठी नसून समाजात महत्त्वाच्या विषयावर चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न आहे. अभिनेत्री काजल अग्रवालनेही या चित्रपटाबद्दल भावना व्यक्त केल्या आहेत. आई म्हणून ही कथा स्वतःला जवळची वाटल्याचे सांगत, अन्नाच्या सुरक्षिततेबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण होईल, अशी आशा तिने व्यक्त केली.

चित्रपटाचे दिग्दर्शक चेतन डीके यांच्या मते, हा चित्रपट केवळ एक कथा नसून प्रत्येक कुटुंबाशी संबंधित असलेल्या विषयावर विचार करायला लावणारा प्रयत्न आहे. लोकांनी आपल्या ताटात येणाऱ्या अन्नाबद्दल अधिक जागरूक व्हावे, हा या चित्रपटाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

स्लो पॉइझन इन प्रोग्रेसफ हा चित्रपट २४ जुलै २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये हिंदी, तेलुगू आणि तामिळ भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# फक्त ५ एपिसोड असलेली, आयएमडीबीकडून जबरदस्त रेटिंग मिळालेली ही सीरिज

स्वप्नांच्या मागे धावणाऱ्या दोन तरुणांवर आधारित सीरिज ओटीटीवर घालतेय धुमाकुळ, कुठे पाहायची? घ्या जाणून... ओटीटीवर धुमाकुळ घालतेय “ही” सीरिज गेल्या काही वर्षांपासून ओटीटी आणि वेब सीरिजची प्रचंड क्रेझ वाढली आहे. ओटीटीवर विविध जॉनरच्या सीरिज प्रदर्शित



होत असतात. काही सीरिजचे तर कित्येक सीझनसुद्धे आले आहेत परंतु, तरीसुद्धा त्यांची क्रेझ काही कमी झालेली नाही. अशातच आता ओटीटीवर सद्या एका वेब सीरिजची खूप चर्चा आहे. महत्त्वाचं म्हणजे या सीरिजच्या सर्व एपिसोडला जबरदस्त रेटिंगसुद्धा आहे.

ओटीटीवर सध्या मोठ्या प्रमाणात पाहिली जात असलेली ही सीरिज फक्त पाच भागांची असून ती २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या लोकप्रिय सीरिजचा दुसरा भाग आहे. आता हा दुसरा सीझनसुद्धा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत असून मोठ्या प्रमाणात पाहिला जात आहे. या सीरिजचं नाव आहे ‘सपने व्हर्सेस एव्हरीवन सीझन २’. टीवीएफच्या बॅनरखाली बनलेल्या आणि अंबरीश वर्मा दिग्दर्शित या सीरिजचा पहिला भाग फक्त ५ एपिसोडचा होता परंतु, आयएमडीबीवर या सीरिजला चांगली रेटिंग आहे.तब्बल तीन वर्षांनंतर, म्हणजेच मे २०२६ मध्ये ‘सपने व्हर्सेस एव्हरीवन’चा दुसरा सीझन प्रदर्शित झाला आणि त्याने पहिल्या सीझनपेक्षाही अधिक यश मिळवलं. प्रदर्शित झाल्यापासूनच ही वेबसीरिज ओटीटीवर धुमाकूळ घालत आहे. भारतातच नव्हे तर जगभरातील प्रेक्षकांकडून तिला भरभरून प्रतिसाद मिळत आहे. विशेष म्हणजे, ही जगातील सर्वाधिक आयएमडीबी रेटिंग मिळालेल्या वेबसीरिजपैकी एक ठरली आहे. या सीरिजच्या प्रत्येक एपिसोडला आयएमडीबीवर वर ९.७ इतकं रेटिंग मिळाले आहे.‘सपने व्हर्सेस एव्हरीवन’च्या पहिल्या सीझनमधील पाचही एपिसोडला ९.५, ९.४ असे रेटिंग्स मिळाले होते तर आताही दुसऱ्या भागालाही चांगले रेटिंग्स मिळाले आहेत. दुसऱ्या सीझनच्या पहिल्या चार एपिसोडला ९.७ इतके रेटिंग्स मिळाले असून पाचव्या एपिसोडला९.८ इतके रेटिंग मिळालं आहे.

सीरिजची कथा काय आहे?

ङ्गसत्य स्वीकारण्यापेक्षा जीव घेणं सोपं झालंयङ्ग; केतन अग्रवाल प्रकरणावर संतापलेली हिना खान म्हणाली, ङ्गत्याला ‘सपने व्हर्सेस एव्हरीवन’ची कथा आपल्या स्वप्नांसाठी झपाटलेल्या दोन व्यक्तींभोवती फिरते. हळूहळू उलगडणाऱ्या त्यांच्या प्रवासातून संघर्ष, कठोर व्यवस्था आणि यशासाठी मोजावी लागणारी मोठी किंमत यांसारखे विषय प्रभावीपणे मांडले आहेत. या वेबसीरिजमध्ये परमवीर सिंह, अंबरीश वर्मा, विजयंत कोहली, अभिषेक चौहान आणि किरणदीप कौर यांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. ही सीरिज प्राईम व्हिडीओवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

# दीपाली सय्यद साकारणार रुपाली चाकणकरांची भूमिका; महाराष्ट्र स्टीन फाईल्सचा फर्स्ट लूक चर्चेत!

मुंबई : राजकीय घडामोडींवर आधारित आगामी 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या चित्रपटाचा फर्स्ट लूक प्रदर्शित झाला असून, त्याची जोरदार चर्चा रंगली आहे. या चित्रपटात अभिनेत्री दीपाली सय्यद या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांच्या भूमिकेत दिसणार आहेत. तर पोस्टरमध्ये अभिनेते अशोक खरात यांची पाठमोरी झलक दाखवण्यात आली असून, ते नेमकी कोणती भूमिका साकारणार याबाबतचा सस्पेन्स अद्याप कायम आहे. फ्लेमिंगो क्रिएशन आणि मातोश्री एन्टरटेन्मेंट वर्ल्ड प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती देवेंद्र भट, सुर्यकांत भुंडे आणि प्रशांत कदमपुरे यांनी केली आहे. दिग्दर्शक स्वरूप बी. सावंत यांच्या दिग्दर्शनाखाली






चित्रपटाचे चित्रीकरण सध्या वेगाने सुरू आहे. 'आता सगळं उघड होणार...!' या टॅगलाईनसह प्रदर्शित झालेल्या फर्स्ट लूकने प्रेक्षकांची उत्सुकता वाढवली आहे.

फर्स्ट लूकमध्ये दीपाली सय्यद यांचा प्रभावी लूक विशेष लक्ष वेधून घेत आहे. त्यांच्यासोबत अभिनेते उदय टिकेकर यांचीदेखील झलक पाहायला मिळत आहे. दिग्दर्शकांच्या मते, रुपाली चाकणकर यांची व्यक्तिरेखा प्रभावीपणे साकारण्याची क्षमता असल्यामुळेच दीपाली सय्यद यांची या भूमिकेसाठी निवड करण्यात आली. राजकीय, सामाजिक आणि आध्यात्मिक घडामोडींशी संबंधित महत्त्वाच्या प्रकरणावर आधारित हा चित्रपट असल्याचा दावा निर्मात्यांनी केला आहे. त्यामुळे घोषणेपासूनच महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स चर्चेचा विषय ठरला आहे. हा चित्रपट २ ऑक्टोबर २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.चित्रपटाची कथा सागरकुमार एस. जैन यांनी लिहिली असून, पटकथा आणि संवाद संजय नवगिरे यांनी लिहिले आहेत. सिनेमॅटोग्राफी आकाश काकडे, कला दिग्दर्शन अक्षय आंबेकर, वेशभूषा आकांक्षा गांधी, प्रॉडक्शन हेड सचिन घनवट आणि प्रॉडक्शन कंट्रोलर नेहा घोडके यांनी जबाबदारी सांभाळली आहे.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुलमध्ये मोहरम सण उत्साहात साजरा



**लातूर/प्रतिनिधी:** मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लातूर येथील लॉर्ड श्रीकृष्णइंग्लिश स्कुल मध्ये विद्यार्थ्यांनीमोहरम सण उत्साहात साजरा केला.

विद्यार्थ्यांनाभारतीय संस्कृतीतील सणांची ओळख व्हावी या दृष्टीने लॉर्ड श्रीकृष्णइंग्लिश स्कुल मध्ये आज शाळेत शिक्षिका व विद्यार्थ्यांनी मोहरम सण साजरा केला. शाळेच्या शिक्षिका प्रियांका नागलबोने यांनी मोहरम सण विषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. यावेळी शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका संगीता शेटे, रुपाली कोकेटे, नम्रता झांबरे, विद्या पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्र संचलन शाळेच्या शिक्षिका साक्षी मुंडे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीपरिश्रम घेतले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी जयंती उत्सव समितीद्वारा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



**लातूर/प्रतिनिधी:** डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी जयंती उत्सव समितीद्वारा सन २०२२ पासून महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी, विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाज प्रबोधनपर कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येते.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त राजर्षी छत्रपती शाहू चौक येथे त्यांच्या प्रतिमेला समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.संजय वाघमारे आणि सचिव डॉ.बाळासाहेब गोडबोले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला आणि सर्व सदस्यांनी विनम्र अभिवादन केले. त्यानंतर विजयी घोषणा सुद्धा देण्यात आल्या.

यावेळी माजी उपप्राचार्य प्रा.कल्याण कांबळे, कोषाध्यक्ष डॉ.संजय गवई, प्रा.प्रशांत उघाडे, विनायक बोरीकर, नागोराव कांबळे आणि ॲड. गणेश गोमारे यांच्या सह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# युवकांच्या शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगारासाठी शासन कटिबद्ध - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### मराठा समाजातील युवकांच्या सर्वांगिण विकासासाठी सारथीचे उल्लेखनीय कार्य; विविध स्पर्धा परीक्षांतील यशस्वी विद्यार्थी आणि पालकांचा सन्मान सोहळा

**पुणे/प्रतिनिधी :** मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी शिक्षण, कौशल्य विकास, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, उद्योजकता आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित संधी उपलब्ध करून देण्याचे धोरण राज्य शासनाने स्वीकारले असून, या उद्दिष्टासाठी स्थापन झालेल्या 'सारथी' संस्थेच्या माध्यमातून झालेले कार्य उल्लेखनीय आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणेच्यावतीने गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित संघ लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांच्या सन्मान सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते.

कार्यक्रमास उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आमदार योगेश टिळेकर, विक्रम काकडे, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, हेमंत रासने, राहुल कुल, बापूसाहेब पठारे, अभिमन्यू पवार, महापौर मंजुषा नागपुरे, सारथीचे अध्यक्ष अजित निंबाळकर, व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह, नियोजन विभागाच्या सचिव शैला ए, विभागीय आयुक्त शीतल तेली उगले, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, मनपा आयुक्त नवलकिशोर राम, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सारथीचे संचालक मधुकर कोकाटे आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सारथीच्या माध्यमातून आतापर्यंत केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारो घेण्यात येणाऱ्या परिक्षेत १४०, महाराष्ट्र लोकसेवा आयोग १ हजार १२४ आणि बँकिंग क्षेत्रात ५०० हून अधिक तरुण-तरुणी यशस्वी झाले आहेत. विविध कौशल्य विकास प्रशिक्षणांतून १३ हजारांहून अधिक युवक रोजगारक्षम झाले असून दोन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना विविध प्रशिक्षणांचा लाभ मिळाला आहे. मराठा समाजातील



आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागे राहिलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार या तीन पैलूंवर आधारित धोरण राबविण्यात आले.

उच्च शिक्षण क्षेत्रात व्यावसायिक शिक्षणासाठी मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शैक्षणिक शुल्कात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला. मोठ्या शहरात होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे, यासाठी वासतिगृह आणि भाऊसाहेब पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना सुरू करण्यात आली आणि विद्यार्थ्यांना ६० हजार रुपयापर्यंत आर्थिक सहकार्य करण्यास सुरुवात झाली. उद्योजकता विकासासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ गतिमान करण्यात आले आणि व्याज सवलत सुरू करण्यात आली. या माध्यमातून पाऊणे दोन लाखापेक्षा अधिक उद्योजक तयार झाले असून साडेसात हजार कोटी रुपयांहून अधिक कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. यासाठी शासन वर्षाला १५०० कोटी देते , असे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री म्हणाले, मराठा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी पोहोचविण्यासाठी सारथी संस्थेची स्थापना करण्यात आली. स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाबरोबरच संशोधन, पीएच.डी., कौशल्य विकास, रोजगाराभिमुख प्रशिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानातील कौशल्य विकसित करण्यासाठी सारथीने प्रभावी काम केले आहे. आज केवळ प्रशासकीय सेवाच नव्हे, तर खासगी क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होत असून विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणक तंत्रज्ञान, भाषा प्रयोगशाळा, टूल लॅब, ड्रोन तंत्रज्ञान यांसारख्या आधुनिक कौशल्यांकडे वळावे, असे आवाहन त्यांनी केले.

शेती क्षेत्रातही राज्य शासनाने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'महाविस्तार' ॲप सुरू केले असून सुमारे ५० लाख शेतकरी त्याचा वापर करत आहेत. ड्रोन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीत मोठे परिवर्तन होणार असून त्यासाठी आवश्यक ड्रोन पायलट प्रशिक्षणही सारथीमार्फत सुरू करण्यात आल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, लातूर आणि कोल्हापूर येथे सारथीची विभागीय केंद्रे, विद्यार्थी वसतिगृहे आणि प्रशिक्षण सुविधा उभारण्याचे काम सुरू असून पुढील वर्षभरात ही कामे पूर्ण होतील, अशी माहिती त्यांनी दिली.

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थमंत्री असताना सारथीला आवश्यक निधी उपलब्ध करून दिला तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही निधीची कमतरता भासू दिली नाही. त्यामुळे सारथी आज सक्षम संस्थेच्या रूपात उभी राहिली असून त्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

एमपीएससी परीक्षा वेळेत, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने घेण्यावर शासनाचा भर आहे. परीक्षांमध्ये ऑनलाईन पद्धतीबाबत विद्यार्थ्यांशी सविस्तर चर्चा करूनच निर्णय घेतला जाईल. कोणताही निर्णय विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊनच होईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

स्पर्धा परीक्षांमध्ये गुणवत्तेने पात्र ठरूनही जागा कमी असल्यामुळे नोकरी न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'निपुण सेतू' उपक्रम सुरू करण्यात येणार असून अशा विद्यार्थ्यांना खासगी क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल आणि त्यांच्या प्रशिक्षणाचा खर्च राज्य शासन उचलणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. सारथी आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची कार्यालये एकत्र आणून विद्यार्थ्यांना आणि युवकांना एकाच ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचा विचार असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

'सारथी' ही सामाजिक परिवर्तन, शैक्षणिक प्रगती आणि युवा सक्षमीकरणाची प्रभावी चळवळ - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) ही केवळ शासकीय योजना राबवणारी संस्था नसून सामाजिक परिवर्तन, शैक्षणिक प्रगती आणि युवा सक्षमीकरणाची प्रभावी चळवळ आहे. समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि तळागाळातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे विचार सारथीच्या कार्यातून प्रत्यक्षात येत असल्याचे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी काढले.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या सामाजिक न्याय दिनाच्या पार्श्वभूमीवर गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केवळ विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक यशाचा नसून महाराष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्याचा उत्सव आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जिद्द, गुणवत्ता आणि कठोर परिश्रमाच्या बळावर विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामागे त्यांच्या पालकांचा त्याग, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि सारथीची भक्कम साथ आहे.

शिक्षण, संशोधन, कौशल्य विकास, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि उद्योजकता या सर्व क्षेत्रांत सारथीने उल्लेखनीय कामगिरी असल्याचे नमूद करून त्या म्हणाल्या, संस्थेच्या उभारणी आणि बळकटीकरणामध्ये माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विशेष योगदान आहे. सारथीच्या प्रशासकीय मुख्यालयासह आठ विभागीय कार्यालये आणि प्रत्येकी ५०० विद्यार्थी व ५०० विद्यार्थिनींसाठी सुसज्ज वसतिगृह उभारणीसाठी १ हजार ३६० कोटी रुपयांच्या प्रकल्पास मंजुरी देण्यात आली होती. त्यांच्या दूरदृष्टीमुळे हजारो विद्यार्थ्यांसाठी संधीची नवी दालने खुली झाली.

स्पर्धा परीक्षा क्षेत्रात सारथीने आजपर्यंत युपीएससीमध्ये १४० तर एमपीएससीमध्ये १ हजार २४५ अधिकारी घडविले असून विविध शासकीय सेवांमध्ये हजारो युवक-युवती कार्यरत आहेत. ही केवळ आकडेवारी नसून समाजाच्या आत्मविश्वासाचा आणि परिवर्तनाचा जिवंत पुरावा आहे. छत्रपती संभाजी महाराज सारथी व्यक्तिमत्व व संगणक कौशल्य विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असून ग्रामीण भागातील युवक डिजिटल कौशल्याशी जोडले गेले आहेत. विविध शिष्यवृत्ती आणि प्रशिक्षण योजनाही प्रभावीपणे राबविल्या जात असल्याचेही उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

राज्य शासन युवकांच्या स्वप्नांना पंख देणाऱ्या प्रत्येक उपक्रमाच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. सारथीच्या सर्व योजनांसाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या, आजचा सन्मान हा प्रवासाचा शेवट नसून नव्या जबाबदारीची सुरुवात आहे. प्रशासनात कार्य करताना सामान्य नागरिक हा केंद्रबिंदू ठेवून सेवा करावी. सारथीने घातलेल्या यशाच्या पायाचा अभिमान बाळगत भविष्यात संस्थेतील गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात द्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी केले.

सारथी संस्थेचे अध्यक्ष अजित निंबाळकर यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या स्थापनेपासूनच्या कार्याचा आढावा सविस्तर मांडला. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून संस्था सुरु झाल्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे योगदान अधोरेखित केले.

यावेळी सारथीच्या माध्यमातून यश संपादन केलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.




राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस जिल्हाधिकारी कार्यालय येथे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्ष उषाताई पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार विक्रम काळे, आमदार बसवराज पाटील, आमदार संजय बनसोडे, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी उपस्थित होते.

## राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन



**लातूर/प्रतिनिधी:** लातूर : येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय व संगमेश्वर विद्यामंदिरात लोकराजा, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती शुक्रवारी उत्साहात साजरी करण्यात आली.

राजमाता जिजामाता विद्यालयात संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, तुळजाभवानी विद्यालयात मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, तर संगमेश्वर विद्यामंदिरात राजेंद्र जायेभाये यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

बहुजन उध्दार, शिक्षण प्रसार आणि आरक्षणाचे जनक म्हणून राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य अजरामर आहे. त्यांच्या कार्याचे आजच्या राजकारण्यांनी अनुकरण करावे, असे आवाहन यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी केले.

या कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे, संचालक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## जगाला अन्न पुरविण्याची क्षमता भारतात; तंत्रज्ञानाधारित शेती आणि संशोधन हाच विकासाचा मार्ग - पद्मश्री डॉ. श्रीरंगदादा लाड

**लातूर/प्रतिनिधी:** भारत हा केवळ कृषीप्रधान देश नसून जगाच्या अन्नसुरक्षेची जबाबदारी पेलण्याची क्षमता भारतीय शेतकर्यांमध्ये आहे. मात्र त्यासाठी शेतीमध्ये संशोधन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि तंत्रशुद्ध शेतीपद्धतीचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन पद्मश्री कृषी संशोधक डॉ. श्रीरंगदादा लाड यांनी केले.

भारतीय किसान संघाच्या वतीने अंबाजोगाई रोडवरील विश्वनाथपूरम येथील एमआयटी शिक्षण संस्था संकुलातील संत श्री ज्ञानेश्वर महाराज डोम येथे आयोजित भव्य शेतकरी मेळाव्यात डॉ. श्रीरंगदादा लाड प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले, विभागीय संघचालक संजय अग्रवाल, एमआयटी समूहाचे विश्वस्त तथा रामेश्वरचे माजी सरपंच तुळशीरामअण्णा




कराड, एमआयटी समूहाचे संचालक प्रा. तेजस कराड, महिला विभाग प्रमुख शामलताई हुरदळे आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना डॉ. श्रीरंगदादा लाड म्हणाले, शेती ही केवळ व्यवसाय नसून ती आपली संस्कृती आणि जीवनाचा आधार आहे. शेतकर्यांनी 'भारत मातेसाठी काहीतरी करण्याची' भावना जोपासत शेतीकडे पाहिले पाहिजे. प्रत्येक पिकामध्ये संशोधनाची दृष्टी ठेवून आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास कमी खर्चात अधिक उत्पादन घेणे शक्य आहे. मर्यादित बियाण्यांच्या वापरातूनही तंत्रशुद्ध पद्धतीने विक्रमी उत्पादन मिळू शकते, असा अनुभव त्यांनी यावेळी मांडला.

आपल्या संशोधन प्रवासाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, लहानपणापासून शेतीची आवड असल्याने नावीन्यपूर्ण प्रयोग करण्याची प्रेरणा मिळाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील कार्यकाळात शेती संशोधनाची दिशा मिळाली आणि त्यातून कापूस पिकावरील संशोधनाला सुरुवात झाली. या संशोधनाला विद्यापीठाची मान्यता मिळाल्यानंतर देशासह जगभर त्याचा स्वीकार झाला. आज शेतकर्यांचे वाढलेले उत्पादन आणि उत्पन्न हेच आपल्या संशोधनाचे खरे यश असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी डॉ. लाड यांच्या हस्ते लातूर जिल्ह्यातील उपक्रमशील शेतकर्यांचा तसेच एमआयटी महाविद्यालयातील विविध स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला. प्रत्यक्ष शेती करणार्या युवा प्रतिनिधी वैभवी जितेश चापसी यांची भारतीय किसान महासंघाच्या नव्या जबाबदारीसाठी नियुक्ती जाहीर करण्यात आली.

अध्यक्षीय समारोपात प्रा. तेजस कराड म्हणाले, शेतकरी सक्षम झाला तर राष्ट्र सक्षम होईल. शेतीमध्ये आधुनिक विचार, तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचा स्वीकार करून तरुणांनी मोठ्या प्रमाणावर शेती क्षेत्रात उतरले पाहिजे. शेतकर्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय किसान संघ राबवत असलेल्या उपक्रमांना एमआयटी समूहाचा कायम सक्रिय पाठिंबा राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले यांनी मेळाव्याच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली, तर विभागीय संघचालक संजय अग्रवाल यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास आराध्ये व परमेश्वर सोनवणे यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी सतीश देशपांडे तावशीकर व भारतीय किसान संघाच्या पदाधिकार्यांनी परिश्रम घेतले. आभार प्रांत प्रतिनिधी नवनाथ मद्दे यांनी मानले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# सामाजिक न्याय दिन तथा छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती पोदार मध्ये उत्साहात साजरी



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे सामाजिक न्याय दिन तथा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी शाळेचे प्राचार्य, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून शाहू महाराजांना अभिवादन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनकार्यावर, सामाजिक न्याय, समता, शिक्षणाचा प्रसार आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेल्या कार्यावर आधारित पोवाडा सादर केला. शिक्षकांनीही शाहू महाराजांच्या विचारांचे आजच्या समाजातील महत्त्व स्पष्ट करून विद्यार्थ्यांना समता, बंधुता आणि सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव करून दिली. प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षण, सामाजिक सुधारणा आणि सर्वसमावेशक विकासासाठी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचा अंगीकार करून समाजात समानता आणि मानवतेची मूल्ये जोपासणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय, समता आणि लोककल्याणाच्या मूल्यांची प्रेरणा मिळाली. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन इयत्ता दहावीच्या वर्गशिक्षिका सौ स्वाती वाकेकर मॅडम यांनी केले.

तसेच या कार्यक्रमासाठी स्कूलचे उप प्राचार्य श्री निलेश जाधव सर, कार्यक्रमाधिकारी सौ सुप्रिया रायगुडे मॅडम, प्रशासकीय अधिकारी श्री जीवन कुलकर्णी सर, श्री प्रदीप शिंदे सर, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाडी पडल्या आणि पेढा अचानक शुद्ध झाला? मग याआधी जनतेच्या ताटात काय वाढलं जात होतं?

## अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईनंतर सरमकुंडी फाट्यावर '१००% शुद्ध' पेढ्यांचा दावा; मग पूर्वी गुणवत्ता कुठे हरवली होती?

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- सरमकुंडी फाटा म्हणजे महाराष्ट्रभर प्रसिद्ध असलेला पेढ्यांचा ठिकाण. अनेक वर्षांपासून हजारो प्रवासी या ठिकाणी थांबून पेढे खरेदी करतात. मात्र अलीकडे अन्न व औषध प्रशासनाने भेसळविरोधी धडक मोहीम सुरू केली आणि तपासणीचा बडगा उगारला, त्यानंतरच व्यापाऱ्यांनी 'आता १०० टक्के शुद्ध पेढे' देण्याची घोषणा केली. यामुळे एक मोठा प्रश्न जनतेच्या मनात उभा राहिला आहे.

जर आज शंभर टक्के शुद्ध पेढे देता येत असतील, तर आतापर्यंत ग्राहकांना नेमकं काय विकलं जात होतं?

हा प्रश्न केवळ ग्राहकांचा नाही, तर लाखो रुपयांचा व्यवसाय करणाऱ्या पेढा उद्योगाच्या विश्वासार्हतेवरही बोट ठेवणारा आहे.

वर्षानुवर्षे सरमकुंडी फाट्यावरील पेढ्यांचा दर्जा घसरल्याच्या तक्रारी प्रवाशांकडून होत होत्या. खव्याच्या गुणवत्तेबाबत शंका उपस्थित होत होती. मात्र प्रशासनाच्या धाडी सुरू होताच व्यापाऱ्यांनी गुणवत्ता सुधारण्याचा निर्णय घेतला. यावरून कारवाईची भीतीच गुणवत्ता सुधारण्यामागील कारण ठरली का? असा सवाल उपस्थित होत आहे.

ग्राहकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्न मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. हा हक्क प्रशासनाच्या धाडीमुळे नव्हे, तर व्यापाऱ्यांच्या प्रामाणिकपणामुळे कायम राखला गेला पाहिजे. केवळ तपासणीच्या काळातच गुणवत्ता सुधारणे आणि नंतर पुन्हा जुनीच परिस्थिती निर्माण होऊ नये, अशी जनतेची अपेक्षा आहे.

धाडी नसत्या पडल्या तर गुणवत्ता सुधारली असती का? ग्राहकांचा विश्वास परत मिळवण्यासाठी केवळ घोषणा पुरेशा आहेत का?

अन्न व औषध प्रशासन नियमित तपासण्या करणार का?

दोषी आढळल्यास कठोर कारवाई होणार का?

सरमकुंडीचा पेढा हा महाराष्ट्राची ओळख आहे. त्यामुळे त्या नावाला साजेशी गुणवत्ता कायम राखणे ही व्यापारी आणि प्रशासन या दोघांचीही संयुक्त जबाबदारी आहे. शुद्धतेची घोषणा स्वागतार्ह आहे; मात्र ती कायम कृतीत उतरली तरच ग्राहकांचा विश्वास पुन्हा दृढ होईल.

# दीड महिन्यांमध्ये केवळ १९१ श्वानांचे निर्बिजीकरण:मोकाट श्वानांचा उच्छाद

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव तीन वर्षाच्या प्रतीक्षेनंतर धाराशिव शहरात श्वान निर्बीजीकरणाची मोहीम सुरु झाली होती. दीड महिन्यात तब्बल १९१ मोकाट श्वान पकडून त्यांचे निर्बीजीकरण केले. त्यानंतर उत्तरप्रदेशहून आलेली सहा कर्मचाऱ्यांची टीमच पळून गेली. त्यामुळे पुन्हा या मोहीमेला ब्रेक बसला आहे. त्यामुळे मोकाट श्वानांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. श्वानदंशाचे प्रकारही झपाट्याने वाढू लागले आहेत.

मागील अनेक वर्षापासून शाळा, महाविद्यालय परिसरातही कुत्र्यांचा धुमाकूळ असतो. लहान मुलांवर कुत्र्यांचे हल्ले वाढले आहेत. श्वान दुचाकीचाही पाठलाग करीत असल्याने अनेक दुचाकीस्वारही जायबंदी झाले आहेत. निर्बिजीकरणाची मोहीम राबवण्यात यावी, अशी मागणी नागरिकांतून केली जात होती.

*मे महिन्यापासून पालिकेकडून या मोहिमेला गती देण्यात आली होती. त्याची जबाबदारी कोल्हापूर येथील जेनिस स्मित अनिमल वेलफेअर, ट्रस्ट या कंपनीवर सोपवण्यात आलेली आहे. कुत्रे पकडण्यासाठी उत्तरप्रदेश येथील प्रशिक्षित ६ कर्मचाऱ्यांचे पथकही तयार करण्यात आले होते. पथक शहरातील विविध भागात फिरुन रेस्क्यू करीत होते. दीड महिन्यात पथकाने १९१ श्वान पकडले. पशुवैद्यकीय तज्ज्ञांनी १९१ श्वानांचे निर्बीजीकरण केले. त्यानंतर उत्तर प्रदेशचे कर्मचारीही गावी जाऊन येतो म्हणून गेले ते. अद्याप पर्यंत परतलेले नाहीत. त्यामुळे मागील दहा दिवसापासून श्वान पकडण्याची मोहिमेस ब्रेक बसला आहे. श्वानांचा धुमाकूळ वाढला असून, दहा दिवसात २० जणांना श्वानांनी चावा घेतल्याच्या घटना घडल्या आहेत. अभिजित गोरे, नगर परिषदेचे स्वच्छता निरीक्षक*

श्वान पकडून, त्याचे टॅगिंग करणे, निर्बीजीकरण होईपर्यंत सांभाळ, निर्बिजीकरणानंतर पाच दिवस सांभाळ करणे, त्यानंतर ज्या ठिकाणाहून श्वान पकडून आणले त्या ठिकाणी त्याला सोडून देणे. यासाठी तब्बल एका श्वानासाठी १२०० रुपये खर्च केला आहे.

# निर्जला एकादशी; बालाजी मंदिरामध्ये गीतापठण:विठ्ठल मंदिरात भजनसेवा

धाराशिव (प्रतिनिधी)-निर्जला एकादशीनिमित्त धाराशिव शहरातील मारवाडी गल्लीतील बालाजी मंदिरात एकादशी ग्रुपतर्फे गीतापठण तर बँक कॉलनीतील विठ्ठल मंदिरात श्री विठ्ठल-रुक्मिणी महिला भजनी मंडळातर्फे भजन, तसेच सायंकाळी आरती असे धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले.

यंदा अधिकमासामुळे वर्षभरात २४ ऐवजी २६ एकादशी आल्या आहेत. वर्षभर एकादशीचे उपवास करता न आलेल्यांनी निर्जला एकादशीचा उपवास केल्यास वर्षभराच्या एकादशीचे पुण्य लाभते, असे मानले जाते. गुरुवारी बालाजी मंदिरात सकाळी ११ वाजता सुनिता दहिठणकर यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत भगवद्गीता पठण व विष्णुसहस्रनाम वाचन झाले.

यावेळी प्रमुख पाहुण्या कांता मोदानी यांच्या हस्ते आरती करून फलाहार वाटप करण्यात आला. गीतापठण व विष्णुसहस्रनामाच्या सामूहिक पठणाने बालाजी मंदिर परिसर दुमदुमून गेला. यावेळी संजय ठाकरे-पाटील यांनी महिलांना निर्जला एकादशीचे महत्त्व सांगून आगामी चातुर्मासात व्रत-वैकल्य करण्याचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास बंडू प्रयाग, अविनाश पाटील, सुभाष पाटील तसेच मनीषा गोवर्धन, सुवर्णा कुलकर्णी, शीतल जोशी, अश्विनी कुलकर्णी, वासंती कुलकर्णी, राजर्षी किरकसे, स्वाती देशपांडे यांच्यासह सुमारे ९० महिला व १० पुरुष भक्त सहभागी झाले होते.

बँक कॉलनीत विठ्ठल नामाचा गजर निर्जला एकादशीनिमित्त बँक कॉलनीतील विठ्ठल मंदिरात श्री विठ्ठल-रुक्मिणी महिला भजनी मंडळातर्फे दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत भजनसेवा करण्यात आली. या वेळी महिलांनी विठ्ठल नामाचा गजर करत भक्तिमय वातावरण निर्माण केले. भजन कार्यक्रमात जयश्री कोकाटे, शुभांगी शिंदे, भाग्यश्री सूर्यवंशी, सुमित्रा इंगळे, रेखा गवळी, रेखा पवार, सुषमा पंखे यांच्यासह महिला सदस्य सहभागी झाल्या होत्या. दर एकादशीला बँक कॉलनीतील विठ्ठल मंदिरात नियमितपणे भजनसेवा केली जाते.


# लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708
9284321472


# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा समाजपरिवर्तनासाठी प्रेरणादायी- डॉ.अंबादास मंजुळकर



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोकराजा , राजर्षी शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी प्राचार्य डॉ.अंबादास मंजुळकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी शिक्षण ,सामाजिक न्याय , समता आणि सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी केलेले कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जपत सामाजिक समतेची मूल्ये जोपासणे ही काळाची गरज आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. ते पुढे म्हणाले की, शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानून बहुजन समाजासाठी शिक्षणाची दारे छत्रपती शाहू महाराज यांनी खुली केली. त्याचप्रमाणे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी देखील बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणाची दारे खुली केली आहेत. आणि आज बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचली आहे असे ते म्हणाले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.विवेकानंद चव्हाण यांनी केले.तर आभार कनिष्ठ विभागातील स्टाफ सेक्रेटरी श्री सचिन चव्हाण यांनी मानले.

सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व गुरुदेव कार्यकर्ते आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

# वरुडा गावात कृषीकन्या दाखल; रावे उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन




वरुडा, प्रतिनिधी : शासकीय कृषी महाविद्यालयाच्या ' विद्यार्थी- ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत' (ठ-थए) कृषीकन्या वरुडा गावात दाखल झाल्या असून, त्या आगामी काळात गावातील शेतकरी, महिला बचत गट व युवकांसाठी विविध कृषीविषयक जनजागृती व मार्गदर्शन उपक्रम राबविणार आहेत.

कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित शेती पद्धती व शासकीय योजनांची माहिती थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत कृषीकन्या प्रतिक्षा हारकर, योगिता आनेबोईनवाड, सुचिता शिंदे, श्रेया गायकवाड,पद्मजा तवले, संस्कृती गायकवाड, रोहिणी झोंबाडे, नेहा पायल आणि आकांक्षा मुळे या विद्यार्थिनी गावात विविध कृषीविषयक उपक्रमांचे आयोजन करणार आहेत.

शासकीय कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. डी. एस. पेरके यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम राबविण्यात येत असून, कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिता साबळे, लालासाहेब देशमुख,कार्यक्रम समन्वयक डॉ. किरण थोरात व डॉ. राघवेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी केली जात आहे. या कालावधीत माती परीक्षणाचे महत्त्व, मृदा आरोग्य पत्रिका, सुधारित बियाणे, जैविक शेती, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, कृषी पूरक व्यवसाय तसेच विविध शासकीय योजनांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे या उपक्रमामुळे कृषीकन्यांना प्रत्यक्ष कृषी क्षेत्रातील अनुभव मिळणार असून, शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती त्यांच्या गावातच उपलब्ध होणार आहे. कृषीकन्यांच्या आगमनाचे ग्रामस्थांनी उत्साहात स्वागत केले असून, या उपक्रमास सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : HANGARGEKAR DHANANJAI MOHANRAO TO DHANANJAY MOHANRAO HANGERGEKAR .
Hence for this Declaration i will be known by this name and will use in future the DHANANJAY MOHANRAO HANGERGEKAR. will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- HANGARGEKAR DHANANJAI MOHANRAO.
NEW NAME: DHANANJAY MOHANRAO HANGERGEKAR.
Address :- 27/2548,TULJAI NIWAS,GRAMSEVAK COLONY ROAD, INDRAPRASTHA PATHBANDHARE EMPLOYES HOUSESING SOCIETY,SHAHU NAGAR, DHARASHIV,DIST. DHARASHIV -413501
AADHAR NO.- 589086577749
Mob. No.-9422576773


# तळ्यावरील मोटारीचे ३०००फुट वायरची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सुरज बसवेश्वर बचाटे, रा. हिप्परगा ताड ता. तुळजापूर यांचे दिंडेगाव येथील तळ्यावरील मोटारीचे ३०००फुट वायर एकुण ६०,००० किंमतीचे दि.०३.०६.२०२६ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी सुरज बचाटे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649